
# हाकारा

वर्ष : चोविसावे ◆ अंक : चौथा

ऑक्टोबर - डिसेंबर २००३



# ■ महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ■

## ◆ कार्यकारी मंडळ ◆

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : | डॉ. विजय भानू |
| सचिव | : | डॉ. एस. आर. वाळिंबे |
| सह सचिव | : | अभय कुदळे |
| खजिनदार | : | पुरूषोत्तम आगाशे |
| सभासद | : | वाहरू सोनावणे |
| | : | डॉ. मिलिंद बोकील |
| | : | जयवंत मंत्री |
| | : | ग. शां. पंडित |
| | : | डॉ. कल्पना मुटाटकर |
| | : | डॉ. सुधाकर मोराणकर |

कष्टकरी जनता, भूषण भारता वंदन करतो पददलिता !
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

वर्ष चोविसावे : अंक चौथा

# हाकारा

ऑक्टोबर - डिसेंबर २००३

## ◆ अनुक्रमणिका ◆


| | | | |
|---|---|---|---|
| आदिवासी कायद्यात सुधारणा झाली पाहिजे | : | रा. वि. भुस्कुटे | ३ |
| भारतीय वन धोरण | : | रा. वि. भुस्कुटे | ९ |
| क ठाकूर जात पंचायतीचे विवाह विषयक नियम | : | पुरुषोत्तम आगाशे | १५ |
| मेळघाटातील कोरकू आदिवासी | : | डॉ. धैर्यशील शिरोळे | २२ |
| आदिवासी स्त्री,संस्कृती आणि शिक्षण | : | प्रा. डी. एस. सूर्यवंशी | २४ |
| पंचायत राज्य संस्थेत आदिवासी महिलांचा सहभाग | : | डॉ. श्रीराम महाकरकार | २९ |
| लोकशाहीमधील प्रभावी अस्त्र-माहितीचा अधिकार | : | ग. शा. पंडित | ३१ |
| शासनाने ग्रामसभेला दिलेले जादा अधिकार | : | ग. शा. पंडित | ३३ |
| दलित आदिवासींच्या जमिनी निवासस्थान बळकावण्याचे अत्याचार थोपवलेच पाहिजेत | : | रा. वि. भुस्कुटे | ३७ |
| आयुषीच्या डायरीतील काही पानं | : | ग. शां. पंडित | ३९ |
| पुस्तक परिक्षण - अदिम | : | पल्लवी मराठे | ४४ |
| कविता — त्र्युगनिन्नी | : | वेन्डी रोज | ४७ |
| कविता — आठवा ते ! | : | ज्वॉय हार्जो | ४८ |


◆ पत्रव्यवहाराचा पत्ता
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११००७
दुरध्वनी - २५८८४१५०
मूल्य रू. ३०/-

◆ संपादक
रामचंद्र मुटाटकर

◆ कार्यकारी संपादक,मुखपृष्ठ छायाचित्र
पुरूषोत्तम आगाशे

◆ अक्षर जुळणी
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०

◆ प्रकाशक
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांच्यासाठी
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३० येथे छापून प्रसिद्ध केले.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

आदिवासी म्हणजे जंगलचा राजा. जंगलच्या या राजाने अनंत वर्षे राज्य केले. मात्र त्याने जंगलांचा विनाश होऊ दिला नाही. आपल्या गरजेपुरते लागणारे लाकूड व इतर वन उत्पादने यांचा वापर तो केवळ आपल्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागविण्यासाठीच करत होता. जंगलचा राजा अत्यंत स्वच्छंदीपणे जीवन जगत होता. स्वत:चा आर्थिक फायदा करून घ्यावा असे त्याच्या मनालाही कधी शिवले नाही, आजही ही भावना त्याच्या मनात नसते. केवळ जरूरीपुरताच जंगल साधनसंपत्तीचा उपयोग करून घेणे हाच त्याचा धर्म.

ब्रिटिशांचा अंमल सुरू झाला आणि जंगलच्या राजावर बंधने आली. भारतातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपुर उपयोग करून घेण्याचे धोरण ब्रिटिशांनी आखले. त्यांना सावकार, सरंजामशहा यांची साथ मिळाली. भारतातील वने पाहता पाहता नष्ट होऊ लागली. जंगलचा राजा उघड्यावर पडला.

शेकडो वर्ष जंगलावर अवलंबून असलेला आदिवासी स्थिर शतीकडे वळला, डोंगर उतारावरची, खडकाळ, माळरानातील जमीन कसू लागला. काही आदिवासी कुटुंबे कूळ म्हणून दुसऱ्याची जमीन कसत राहिले. स्वतंत्र भारतात कुळ कायदा, कमाल जमीन धारणा कायदा यासारखे कायदे झाले. या कायद्यांमुळे आदिवासींकडून बिगर आदिवासींकडे होणाऱ्या जमीन हस्तांतरणास प्रतिबंध होईल, त्यांचे शोषण थांबेल असे वाटले होते. मात्र प्रत्यक्षात आदिवासींकडील जमीन हस्तांतरणाला वेग आला . या सर्व गोष्टी थांबवण्यासाठी व आदिवासींच्या हितरक्षणासाठी वर्तक समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र जमीन महसूल आणि कुळवहिवाट कायदे (सुधारणा) १९७४ (कायदा क्र. ३५/१९७४) तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीन पुन:प्रस्थापित करण्यासाठीचा कायदा १९७५ (कायदा क्र. १४/१९७५) असे दोन कायदे करण्यात आले. या कायद्याखाली जमीन परत मिळावी म्हणून आदिवासींना अर्ज करता येत होता. दोन्ही कायद्यांची मुदत तीस वर्षाची ठेवण्यात आली.

आदिवासींच्या जमीन विषयक कायद्यांची चर्चा श्री. रा.वि. भुस्कुटे यांनी आपल्या लेखातून केली आहे. या कायद्यांनी आत्तापर्यंत काहीच साध्य झाले नसून आदिवासींच्या पदरी निराशाच पडली असल्याचे त्यांनी आकडेवारीसह दाखवून दिले आहे. या दोन्ही कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी म्हणून श्री. भुस्कुटे यांनी इतर राज्यातील कायद्यांचा तुलनात्मक अभ्यास करून अत्यंत व्यवहार्य अशा सूचना केल्या आहेत. तसेच या कायद्यांना आणखी वीस वर्षे मुदतवाढ मिळावी अशी आग्रही मागणी त्यांनी केली आहे. आदिवासींना न्याय मिळवून द्यायचा असेल तर शासनाने या गोष्टीचा गंभीरपणे विचार करून अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

आपल्या दुसऱ्या लेखातून श्री. भुस्कुटे यांनी भारतीय वन धोरणाची ओळख करून दिली आहे. इ. स.१८७८ मध्ये ब्रिटिश सरकारने वन कायदा केला. त्यानंतर १९२७ च्या भारतीय वन कायदा अधिक कडक करण्यात येऊन लोकांच्या वनावरील हक्कात कपात करण्यात आली. स्वातंत्र्यानंतर देखील ब्रिटिशांचेच धोरण चालू राहिले. १९८० साली वनसंरक्षण कायदा झाला. यामध्ये लोकसहभागातून वन विकास असे धोरण ठरविण्यात आले आहे. मात्र अजुनही नवा वन कायदा अस्तित्वात आलेला नाही. वन कायद्यात बदल करून आदिवासी व अन्य घटकांच्या सहाय्याने वनांचा विकास करण्याची निकड श्री.भुस्कुटेयांनी व्यक्तकेलीआहे.

श्री. पुरूषोत्तम आगाशे यांनी ठाणे जिल्ह्यातील 'क' ठाकूर समाजातील विवाह विषयक नियमांची माहिती आपल्या लेखातून करून दिली आहे. तर धैयशील शिरोळे यांनी कोरकू या मेळघाटातील वन्य जमातीचा परिचय करून दिला आहे. श्री. भुजंग मेश्राम यांनी अनुवाद केलेल्या कविता अत्यंत भावपूर्ण आहेत. याशिवाय इतर लेखही आहेतच.

हाकाराचा हा अंक सर्वांना आवडेल अशी आशा वाटते. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात , त्यांचे स्वागतच होईल.

– कार्यकारी संपादक

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# आदिवासी कायद्यात सुधारणा झाली पाहिजे

- रा.बि.भुस्कुटे

जगामध्ये आज अंदाजे ४०० आदिवासी जमाती आहेत. त्यांची लोकसंख्या २० कोटी भरेल. जंगलचे ते केवळ राजे नाहीत तर एके काळी ते जगाचे राजे होते. परंतु आदिवासींच्या जमिनी बळकावण्याचे व त्यांना भूमीहीन करण्याचे, त्यांच्यावर अन्याय अत्याचार करणे जगामध्ये सर्वत्र मोठ्या प्रमाणावर शतकानुशतके चालत आले आहे. तेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाने त्यांच्याबाबत १९८७ मध्ये एक अभ्यासपूर्ण अहवाल प्रसिद्ध केला. त्यामधील केवळ जमिनी विषयक निष्कर्ष व सूचनांच मुळी ८९ आहेत. भारतात ६ कोटी ७८ लाख आदिवासी आहेत. जगातल्या इतर देशांप्रमाणेच आदिवासींकडील जमीन लुबाडून त्यांना भूमिहीन करण्याची प्रक्रिया भारतातही शतकानुशतके चालू राहिलेली आहे.

१९४७ मध्ये परक्या ब्रिटिश अंमलातून भारत स्वतंत्र झाला. नवीन राज्यघटनेचा स्विकार करण्यांत आला. या घटनेतील तरतुदींप्रमाणे आदिवासी दलित या मागास वर्गीयांच्या हितरक्षणाची जबाबदारी सरकारने स्विकारली. घटनेच्या कलम ४६ नुसार राज्यांनी दुर्बलेत्तर जमातवर्ग आणि विशेषत: अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करून सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करायचे आहे. घटनेतील या तरतुदी आणि मूलभूत हक्क प्रदान करणाऱ्या अन्य तरतुदींचे पालन करण्यासाठी अनेकविध कायदे करण्यात आले. विशेषत: कुळकायदा, कमाल जमीन धारणा कायदा वगैरे जमीन सुधारणा कायदे करण्यांत आले. 'कसेल त्याची जमीन' या तत्वावर आधारित कुळकायद्यात मूलभूत सुधारणा १९५६ मध्ये करण्यात आली. आणि १ एप्रिल १९५७ रोजीची कुळे त्यांच्या कुळहक्कांच्या जमिनीची गृहीत खरेदीदार झाली. जमीन सुधारणा कायद्यांमुळे विशेषत: कुळकायद्यामुळे आदिवासींकडील बिगर आदिवासींकडे होणाऱ्या जमीन हस्तांतरणाला पायबंद बसेल असे वाटले होते पण प्रत्यक्षात तसे अनुभवाला आले नाही. आदिवासींकडील जमिनीचे हस्तांतरण उलट अधिक वेगाने होत असल्याचे महाराष्ट्रात सर्वत्र अनुभवाला आले.

जमीन महसूल संहिता , कुळ कायदे, भू-धारणा एकत्रीकरण कायदा वगैरे तरतुदींमुळे आदिवासी भूधारक आणि जमीन कसणारे यांना ज्या अडचणींना तोंड द्यावे लागते, त्याबद्दल परिक्षण करून त्यांच्या हितसंबंधाचे चांगल्या प्रकारे संरक्षण व्हावे म्हणून शिफारशी करण्यासाठी श्री. ह. गो. वर्तक, महसूल मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती महाराष्ट्र सरकारने १९७१ मध्ये स्थापन केली. वर्तक समितीने आपला अहवाल शिफारशींसह ७ एप्रिल १९७२ रोजी शासनाकडे सादर केला.

वर्तक समितीच्या शिफारशीनुसार ६ जुलै १९७४ ला सरकारने वटहुकूम काढला. या वटहुकूमाचा उद्देश होता की ....

अ) आदिवासींना त्यांच्या जमिनीबाबत संरक्षण प्राप्त व्हावे.

ब) आदिवासींच्या जमिनीबाबत आतापर्यंत झालेले बेकायदेशीर व्यवहार अवैध घोषित करावेत आणि ...

क) या हस्तांतरीत जमिनी संबंधीत आदिवासींना किंवा त्यांच्या वारसांना परत द्याव्यात.

या वटहुकूमाचे रूपांतर पुढे महाराष्ट्र जमीन महसूल आणि कुळवहिवाट कायदे (सुधारणा) कायदे १९७४ (कायदा क्रमांक ३५/१९७४) मध्ये झाले. हा कायदा वटहुकूमाचे स्वरूपात ६ जुलै १९७४ रोजी अंमलात आलेला होता.

१ एप्रिल १९५७ ते ६ जुलै १९७४ दरम्यान झालेल्या आदिवासींच्या हस्तांतरणाचा प्रश्न कायम राहिला. हा प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात आला. महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमीन पुन:प्रस्थापित करण्यासाठीचा कायदा १९७५ (कायदा क्रमांक १४/१९७५) करण्यात आला. राष्ट्रपतींनी या कायद्याला २८ एप्रिल १९७५ ला मान्यता दिली. हा कायदा १ नोव्हेंबर १९७५ पासून अंमलात आला. मात्र या कायद्याची प्रारंभ तारीख ६ जुलै १९७४ आहे हे लक्षात घ्यावे लागेल. परंतु या कायद्याची विधी ग्राह्यता सर्वोच्च न्यायालयाने दिवाणी अपिल क्रमांक ४३८४/८४ दिनांक ४ डिसेंबर १९८४ च्या निर्णयाने मान्य केलेली आहे. वर्तक समितीच्या अहवालातील शिफारशीप्रमाणे अशा प्रकारे दोन कायदे करण्यात आले आहेत.

ज्या जमिनी आदिवासींकडून बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झाल्या अशा सर्व प्रकरणांना हे कायदे लागू होतात. लक्षात ठेवायची विशेष बाब म्हणजे आदिवासी जमिनीचे हस्तांतरण बिगर आदिवासींकडे कोणत्याही अन्य कायद्याप्रमाणे सक्षम महसूल अधिकाऱ्यांच्या हुकूमाने किंवा दिवाणी कोर्टाचे हुकूमाने जरी झाले असले तरीही, अशा सर्व प्रकरणांना हे कायदे लागू होतात. थोडक्यात जमीन महसूल संहिता, कुळकायदा, दिवाणी कायदा वगैरे कोणत्याही कायद्यानुसार आणि तहसिलदार, प्रांत अधिकारी जिल्हाधिकारी किंवा दिवाणी कोर्टाचे हुकूमाने रितसर कब्जा घेऊन आदिवासींची जमीन १ एप्रिल १९५७ नंतर हस्तांतरीत झाली असली तरीही ती जमीन आदिवासीला परत मिळणार आहे. तथापि परत द्यावयाची जमीन ६ जुलै १९७४ पर्यंत बिगर-शेती उपयोगासाठी वापरली नसेल तरच ती जमीन आदिवासीला पुन: प्राप्त होऊ शकते.

आदिवासी कायदा क्रमांक ३५/१९७४ चे कलम ३६-अ पोटकलम (४) नुसार हा कायदा अंमलात आल्यापासून तीन वर्षाचे आत अदिवासीला त्यांची हस्तांतरीत झालेली जमीन पुन्हा परत मिळावी म्हणून अर्ज करता येत होता. सन १९९१ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ ने ही मुदत ३० वर्षे करण्यात आली. हा कायदा ६ जुलै १९७४ रोजी अंमलात आला आहे. तेव्हा ३० वर्षाची मुदत ५ जुलै २००४ रोजी संपत आहे. याचा अर्थ त्या तारखेनंतर बाधीत आदिवासींना त्यांची हस्तांतरीत जमीन परत मिळावी म्हणून अर्ज करता येणार नाही. आदिवासी कायदा क्रमांक १५/१९७५ चे कलम ३ पोटकलम (१) नुसार ही जमीन हस्तांतरण झालेल्या आदिवासीला हा कायदा अंमलात आल्यापासून ३ वर्षाचे आत जमीन परत मिळावी म्हणून अर्ज करता येत होता. ३ वर्षाची मुदत १९९१ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ प्रमाणे ३० वर्षे करण्यात आली आहे. याचा अर्थ या कायद्याखाली १ नोव्हेंबर २००५ नंतर बाधीत आदिवासीला जमीन परत मिळण्यासाठी अर्ज करता येणार नाही असा होतो . वर्तक समितीने हे दोन्ही कायदे ज्या परिस्थितीत करण्याची शिफारस केलेली होती ती तशीच आहे. या दोन्ही

कायद्यांचा हेतू पूर्णत: साध्य झालेला नाही. अजूनही बेकायदेशीर/ कायदेशीर आदिवासींच्या जमीन हस्तांतरणाची प्रकरणे मोठ्या प्रमाणवर ठिक–ठिकाणी उघडकीस येत आहेत. तेव्हा अजून कमीत कमी २० वर्षे म्हणजे हे दोन्ही कायदे अंमलात आल्यापासून ५० वर्षाच्या मुदतीत बाधीत आदिवासीला त्याची जमीन मिळावी म्हणून अर्ज करता आला पाहिजे. तशी या कायद्यात सुधारणा करण्यांत आली पाहिजे. ज्या कॉंग्रेस सत्ताधिकाऱ्यांनी हे कायदे १९७४ मध्ये केले त्यांनी व त्यामधील ही अत्यावश्यक सुधारणा ऑक्टोंबर २००४ मध्ये होऊ घातलेल्या विधान–सभा निवडणूकीपूर्वी करणे उचित ठरणार आहे.

हे दोन कायदे अंमलात आल्यानंतर २ फेब्रुवारी १९७९ पर्यंत या कायद्याच्या अंमलबजावणी बाबतचा एक अहवाल सचिव आणि आयुक्त आदिवासी कल्याण , आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था पुणे यांनी १९७९ मध्ये प्रसिद्ध केला आहे. त्यातील अंमलबजावणीचा आढावा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशील | महाराष्ट्र कायदा क्र. ३५/ १९७४ | महाराष्ट्र कायदा क्र. १४/१९७५ |
|---|---|---|---|
| १ | सक्षम अधिकाऱ्याकडे नोंदलेली प्रकरणे | १४,७७० | ३१,४०४ |
| २ | प्राथमिक चौकशी नंतर जमीन पुन: प्रस्थापित करण्यास पात्र आढळून आलेली प्रकरणे. | १४,२०१ | ------- |
| ३ | तपशीलवार चौकशी नंतर रद्द झालेली प्रकरणे | ७,९३४ | १४,३७७ |
| ४ | जमीन पुन्हा प्रस्थापित करण्याचा हुकूम झालेली | ६,२६४ | ९,४३७ |
| ५ | प्रत्यक्ष जमीन कब्जा देण्यात आला. | ४,८९५ | ६,४०४ |

दोन्ही कायदे अंमलात आल्यानंतर ५ वर्षाचे कालावधीतील हा अहवाल आहे. वरील आकडेवारी वरून हे स्पष्ट होते की स्थगिती आदेश आणि अन्य कारणांमुळे या कायद्याची अंमलबजावणी समाधानकारक झालेली नसल्याचा निष्कर्ष या अहवालात काढलेला आहे. त्याची तीन प्रमुख कारणे नमुद केलेली आहे.

१) कायद्यामधील त्रुटी
२) आदिवासींमधील अज्ञान
३) जमीन प्रस्थापित करण्यासाठी पार पाडावी लागणारी गुंतागुंतीची प्रक्रिया.

महाराष्ट्र राज्यात या कायद्याच्या अंमलबजावणीची आकडेवारी खालील प्रमाणे आहे. त्यासोबत ठाणे जिल्ह्यातील आकडेवारी देखील दिली आहे.

| वर्गवारी | महाराष्ट्र राज्य | ठाणे जिल्हा |
|---|---|---|
| नोंदलेली प्रकरणे | ४९,८६५ | ६,०६० |
| विचार केलेली प्रकरणे | ४८,४७१ | ६,०५४ |
| रद्द केलेली प्रकरणे | २९,००१ | ४,४१२ |
| आदिवासींना जमीन कब्जा देण्याचा हुकूम झालेली प्रकरणे | १९,४७१ | १,६४२ |

महाराष्ट्र राज्यात सुरू केलेल्या प्रकरणातून ६४% तर ठाणे जिह्यातील ७३% प्रकरणे रद्द करण्यांत आली आहेत. ज्या प्रकरणातून कब्जाचा हुकूम झाला. त्यामध्ये कब्जा दिला गेला नाही. स्थगिती हुकूम येईपर्यंत वाट पहाण्यात आली. बहुतेक सर्व प्रकरणात अपिल अर्ज दाखल झाले. अपिल अर्जात निकाल झाले का? प्रत्यक्ष किती प्रकरणात आदिवासींना कब्जा देण्याचे नाकारण्यात आले याची माहिती उपलब्ध नसल्याचे महाराष्ट्र शासनाकडून सांगण्यात येते. हया दोन कायद्यांची अंमलबजावणी सुरू होऊन आज २५ वर्षे होऊन गेली तेव्हा झालेल्या अंमलबजावणी मूल्यांकन करण्याची आवश्यकता आहे. जर मूल्यांकन केले तर आदिवासी कायदा करण्यामागील हेतू सफल झाला की नाही हे स्पष्ट होईल तसेच ह्या कायद्याखाली प्रलंबित प्रकरणे अजूनही कोणकोणत्या कार्यालयात आहेत, याचीही माहिती उपलब्ध होईल.

आदिवासी पट्ट्यामध्ये विशेषत: ठाणे, नाशिक, धुळे, नंदुरबार , चंद्रपूर मधून आदिवासींमध्ये कार्य करणाऱ्या छोट्या मोठ्या संघटना आहेत. ह्या संघटनांमधून कार्य करणाऱ्या काहींचे म्हणणे असे आहे की, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचा हेतू अंशत: जरी साध्य करायचा असेल तरी शासनाने खाली नमुद केल्याप्रमाणे कारवाई करणे आवश्यक आहे.

१) आदिवासी जमिनींच्या सर्व रद्द केलेल्या (२९,००१ म्हणजे ६४% ) प्रकरणांमध्ये पुन्हा छाननी करण्यात यावी. अनाधिकाराने औचित्य भंग करून बेकायदेशीरपणे रद्द केलेल्या प्रकरणात फेरचौकशी करून आदिवासींना न्याय द्यावा.

२) औद्योगिकरणामुळे आणि शहरीकरणामुळे आदिवासींच्या शेतजमिनींच्या उपयोगात बदल होतो. जमीन हस्तांतरण होणे अनिवार्य होते. या वस्तुस्थितीचे भान ठेवले पाहिजे. अवैध हस्तांतरणामुळे आदिवासींची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होत आहे. तेव्हा विकसित होणाऱ्या या भागातील आदिवासींच्या जमिनींची एक गंगाजळी निर्माण करावी. प्रचलित चालू बाजारभावाने या जमिनी विकून खर्च वजा करून राहिलेली सर्व रक्कम संबंधित आदिवासीला देऊन त्याचे कल्याण साधावे.

३) कोणत्याही प्रकल्पासाठी सार्वजनिक उपयोगासाठी आदिवासींची जमीन राज्य अथवा केंद्र सरकारने संपादन केल्यास या संपादित जमिनींच्या बदल्यात आदिवासींना दुसऱ्या ठिकाणी संपादित केलेल्या जमिनीच्या प्रतीची जमिन देण्यात यावी. त्यांना कोणत्याही परिस्थितीत भूमिहीन करण्यांत येऊ नये.

आता हे कायदे अंमलात येऊन जवळ जवळ २९ वर्षे झाली आहेत. तेव्हा या कायद्यांच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करण्याची निश्चित आवश्यकता आहे. या दोनही कायद्यांचा मुख्य उद्देश कितपत सफल झाले हे देखिल या मूल्यांकनाने सुस्पष्ट होईल. तेव्हा या दोन कायद्यांमधील अर्ज दाखल करण्याची मुदत वाढविण्याचा निर्णय घेतानांच गेले ३० वर्षातील तज्ञांच्या समिती मार्फत या कायद्याच्या अंमलमबजावणीचा तपशीलवार आढावा घेऊन तो प्रसिद्ध केला तर सर्वार्थाने उपयुक्त ठरणार आहे.

महाराष्ट्र राज्याप्रमाणे आदिवासींकडील जमिनींच्या हस्तांतरणावर निर्बंध घालण्यासाठी आणि आदिवासींच्या जमिनी त्यांचेकडे पुन: प्रस्थापित करण्यासाठी आंध्रप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, बिहार, उत्तरप्रदेश, गुजरात, ओरिसा, पश्चिम बंगाल, आसाम, त्रिपुरा, हिमाचल प्रदेश, मेघालय या अन्य राज्यातून कायदे झालेले आहेत. या राज्यांतील कायद्याचा तुलनात्मक अभ्यास केला तर असे दिसून येते की, बिहार, ओरिसा, राजस्थान, आंध्रप्रदेश राज्यातील कायदे महाराष्ट्रातील कायद्यांपेक्षा अधिक पुरोगामी आणि कायद्याचा हेतू साध्य करणारे आहेत. तेव्हा महाराष्ट्रातील आदिवासी कायदे (कायदा क्रमांक ३५/७४ आणि कायदा क्रमांक १४/१९७५) मध्ये आदिवासींनी अर्ज दाखल करण्याच्या ३० वर्षाची मुदत ५० वर्षे वाढविण्यासाठी जी सुधारणा करण्यात येईल त्याचवेळी या आदिवासी कायद्यांमध्ये खालील पुरोगामी तरतुदींचा समावेश करणे योग्य ठरणार आहे. कारण त्यामुळे हे कायदे अधिक परिणामकारक आणि उद्देशपूर्ती करणारे होतील.

१) महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्रात आंध्रप्रदेशाप्रमाणे आदिवासीला आदिवासी व्यतिरिक्त अन्य व्यक्तीला त्याची जमीन विकता येणार नाही.

२) आदिवासीच्या बिगर आदिवासीला झालेल्या जमीन हस्तांतरणाची नोंदच गावच्या भूमी अभिलेखात, नोदणी अधिकाऱ्यांकडे राजस्थान व ओरिसाप्रमाणे करता कामा नये.

३) बिहार राज्याप्रमाणे आदिवासी जमिनीबाबत किंवा स्थावर मिळकतीच्या कोणत्याही दाव्यात डेप्युटी कमिशनर म्हणजे महाराष्ट्रात जिल्हाधिकारी यांना पक्षकार करण्याचे बंधन घालण्यात यावे.

४) ओरिसा व बिहार राज्यातून बेकायदेशीर जमीन हस्तांतरण करणारे किंवा आदिवासीला त्यांच्या जमिनीतून हुसकावणारी व्यक्ती गुन्हेगार असल्याने ती कारावास किंवा दंडाच्या शिक्षेस पात्र ठरविण्यात आली आहे. तशी तरतूद महाराष्ट्र कायद्यातून करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्य पुरोगामी असल्याचा सार्थ अभिमान कॉंग्रेस सत्ताधिकाऱ्यांना आहे. कारण जमीन सुधारणा कायदे मंजूर करून ते अंमलात आणण्यामागे महाराष्ट्राने नेहमी पुढाकार घेतलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. परंतु आदिवासींच्या बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झालेल्या जमिनीबाबत महाराष्ट्र राज्यात करण्यांत आलेल्या कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत मात्र महाराष्ट्र शासन उदासीन आणि निरुत्साही असल्याचे अनुभवास आले आहे. आदिवासी कायदा १४/१९७५, २८ मे १९७५ रोजी राज्यपत्रात प्रसिध्द झाला. तो १ नोव्हेंबर १९७५ पासून अंमलात आला या कायद्याची अंमलबजावणी होऊ नये म्हणून कित्येक याचिका मुंबई उच्च न्यायालयात, सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या. जवळ जवळ १० वर्षांनी म्हणजे ४ डिसेंबर १९८४ रोजी हा कायदा सर्वोच्च न्यायालयात दाखल झाला. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती चीनप्पा रेड्डी यांच्या तीन सदस्यांच्या खंडपिठाने हा निर्णय दिला. (ए. आय. आर. मार्च १९८५ खंड ७२ भाग ८५५, पान क्र. ३८९ ते ४०४) सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय अतिशय पुरोगामी आणि सामाजिक न्यायाच्या सखोल विवेचनावर आधारलेला आहे. या निर्णयानंतर या कायद्याखालील कामकाज सुरू

झाले. तोच ३१ जुलै १९८६ रोजी महाराष्ट्र सरकारने गोपनीय आदेश काढून या कायद्याच्या अंमलबजावणीस स्थगिती दिली थोडक्यात या दोन्ही कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अत्यावश्यक असलेल्या सत्ताधाऱ्यांच्या इच्छाशक्तीचा अभाव आहे ही वस्तुस्थिती स्पष्ट झालेली आहे.

पण महाराष्ट्रातील सध्याच्या राजकीय परिस्थितीचा गंभीरपणे विचार केला तर आदिवासींच्या बिगर आदिवासीकडे होणाऱ्या जमीन हस्तांरणास प्रतिबंध करणाऱ्या आणि हस्तांतरीत जमीन आदिवासींकडे पुनःप्रस्थापित करणाऱ्या कायदा क्रमांक ३५/१९७४ आणि कायदा क्रमांक १४/१९७५ यांना अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे.

आदिवासी कायदा क्रमांक ३५/१९७४ आणि कायदा क्रमांक १४/१९७५ मध्ये सुरूवातीला आदिवासींना अर्ज करण्यासाठी तीन वर्षाची मुदत ठेवलेली होती. वर नमुद केल्याप्रमाणे ही मुदत ३० वर्षे करण्यांत आली. आदिवासी कायदा क्रमांक ३५/७४ दि. ६ जुलै १९७४ रोजी अंमलात आला तर आदिवासी कायदा क्र.१४/७५ दि. २८ मे १९७५ रोजी अंमलात आला आहे. ह्या दोन्ही कायद्यामध्ये नेमून दिलेली ३० वर्षाची मुदत २००४-२००५ मध्ये संपणार आहे. तेंव्हा गेल्या ३० वर्षात आदिवासी कायद्याची अंमलबजावणी कशी झाली? कायद्याचा हेतू साध्य झाला का? ह्या कायद्याखाली अजुनही प्रलंबित प्रकरणे आहेत का? तसेच या कायद्याची ३० वर्षाची मुदत संपल्यानंतर मुदत वाढविण्याची आवश्यता आहे का? या बद्दलचे मूल्यांकन करण्यात आले पाहिजे हे मूल्यांकन ३१ मार्च २००४ पर्यंत होणे अत्यावश्यक ठरते. तरी त्याबद्दल महाराष्ट्र शासनाने गंभीरपणे विचार करावा. मूल्यांकन करण्यासाठी समिती स्थापन करणे जरूरीचे आहे. हया कायद्याच्या अंमलबजावणीबद्दल आलेला अनुभव लक्षात घेता आदिवासींच्या अवैध जमीन हस्तांतरणाची प्रकरणे दिवसेंदिवस कमी न होता वाढत आहेत. याचा विचार करता कोणत्याही परिस्थितीत आदिवासी कायद्याची मुदत कमीत अजून २० वर्ष वाढविणे आवश्यक आहे. यासाठी आदिवासी क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या संघटनाकडून तीव्र संघर्ष केला जाण्याची शक्यता नजरेआड करता येणार नाही.

■ ■ ■

# भारतीय वन धोरण

- रा.वि.भुस्कुटे

देशातील वनांबद्दलची स्वत:ची नीती प्रत्येक राजवट ठरवत असते. ठरवलेली वननीती अंमलात आणण्यासाठी कायदा केला जातो. वननीती व वन कायदा यांचा घनिष्ठ संबंध असतो.

वननीती व वनकायदा याचा थोडक्यात आढावा येथे घेतला आहे.

**ब्रिटिश पूर्व काळ**

भारतामध्ये शास्त्रीय वनव्यवस्थापन ब्रिटिश राजवट सुरू झाल्यानंतर अंमलात आले. अशी गैरसमजूत ब्रिटिश राजकर्त्यांनी निर्माण केली आहे. बहुतेक वन अधिकारी याचा पाठपुरावा करत असल्याचे आढळून येतात पण हे खरे नाही.

ब्रिटिश राजवट सुरू होण्यापूर्वी काही शतकांपूर्वी वनाचे तीन भाग मानले जात होते.

एक : देवराई- पवित्र वन मानण्यात येई. यातील वाळलेली लाकडे देखील लोक नेत नसत. मात्र अत्यंत दुष्काळाच्या काळात देवराया लोकांच्या वापरासाठी खुल्या केल्या जात. आजही अशा परंपरागत देवराया देशात ठिकाठिकाणी आहेत. तेथील स्थानिक समाज मोठ्या श्रध्देनी त्या जोपासत आहेत.

दोन : राजे लोकांची खाजगी वने – याचा वापर प्रामुख्याने शिकारीसाठी केला जाई.

तीन : इतर वने- ही सामाजिक मालकीची मानली जात. या वनातील कोणती झाडे केंव्हा तोडावित या विषयी नियम असत. वनाजवळ रहाणारे गांवकरी त्यांच्या हक्काविषयी आणि कर्तव्याविषयी जागरूक असत.

ह्या काळी लोकसंख्या कमी आणि वने खूप होती त्यामुळे वनसंरक्षणाचा प्रश्न फारसा तीव्र नव्हता.

छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे 'वनावर अधिकार रयतेचा' हे आज्ञापत्र विख्यात आहे. हे आज्ञापत्र खालील प्रमाणे आहे.

'वनावर अधिकार रयतेचाच'

**छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे आज्ञापत्र**

आरमारात तख्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून थोर लाकूड असावे लागते. ते आपले राज्यात अरण्यामध्ये सागवानादि वृक्ष आहेत. त्याचे जे अनुकूल पडेल ते हुजर लेहून हुजुरचे परवानगीने तोडून न्यावे.

या विरहित जे लागेल ते परमुलकीहून खरेदी करून आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे,फणस आदिकरून हेही लाकडे आरमाराचे प्रयोजनाची, परंतु त्यांस हात लावू न द्यावा.

काये म्हणोन की ही झाडे वर्षा दो वर्षांनी होतात यैसे नाही. रयतेने ही झाडे लाऊन लेकरांसारखी बहुतकाळ वाढविली. ती झाडे तोडिलियावरी त्यांचे दु:खास पारावर काये? येकाव दु:ख देऊन जे कार्य करीन म्हणेन ते कार्य करणारासहीत स्वल्पकाळेच बुडोन नाहिसेच होते. किंबहुना धन्याचेचे पदरी प्रजा पीडणाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीही होते या करिता हे गोष्ट सर्वा होऊ न द्यावी. कदाचित येखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल की त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्यांच्या संतोषे न्यावे.

बलात्कार सर्वथा न करावा.

महाराष्ट्रातील बहुतेक सर्व विभागीय वन कार्यालयातून हे आज्ञापत्र ठळक ठिकाणी लावलेले आढळून येते.

### ब्रिटिश राजवटीतील वननीती व कायदा

भारताल येण्यापूर्वी इंग्लंडमधील वने साफ झाली होती. त्यामुळे भारतातील वनांचा व्यापारी वापर करण्याचा भलताच मोह ब्रिटिश राज्यकर्त्यांना साहजिकच झाला. १८५६ मध्ये डिट्रीक बॅडीस या वनस्पती शास्त्रज्ञाला पहिला इनस्पेक्टर जनरल ऑफ फॉरेस्टस् नेमण्यात आले. भारतामध्ये वनखात्याची मुहूर्तमेढ रोवण्यात आली.

१८६५ चा वनकायदा सरकारच्या मालकीखाली असलेल्या वनांच्या नियंत्रणाखाली होता या कायद्याने वनातून लाकडे आणणे आणि बिगर लाकूड वन उत्पन्न गोळा करण्यावर नियत्रंणे लादण्यात आली

### डलहौसीची वननीती

१८७७ मध्ये डलहौसीने वननीतीचा मसूदा तयार केला. १८७८ मध्ये ब्रिटिश सरकारने वनांवरील आपली पकड घट्ट करणारा कायदा केला. या कायद्यात वनाचे तीन भाग पाडण्यात आले.

पहिला वर्ग: आरक्षित वने- या वनावरील लोकांचे हक्क जवळ जवळ नष्ट करण्यात आले.

दुसरा वर्ग : संरक्षित वने- या वनांवरील लोकांचे हक्क मर्यादित करण्यात आले.

तिसरा वर्ग:- ग्रामीण वने- ही वने लोकांच्या उपयोगासाठी खुली ठेवण्यात आली.

या वन कायद्यात लाकडांवर कर बसविण्याची तरतूद करण्यांत आली. नोटीस देऊन काही नियम पाळून कोणतीही वने आरक्षित किंवा संरक्षित जाहीर करण्याचा अधिकार या कायद्याने सरकारला देण्यात आला. वन कायद्याचा भंग करणे हा गुन्हा ठरविण्यात आला. त्यासाठी दंड व कारावासाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली.

### १८९४ वननीतीचा पहिला ठराव

वननीतीचा पहिला ठराव १८९४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला. त्यामध्ये वनव्यवस्थापनाचा प्रमुख उद्देश लोककल्याण हा असला पाहिजे असे जाहीर करण्यात आले. लोककल्याणात करदात्याबरोबर वनात राहणाऱ्या लोकांच्या कल्याणाचा विचार केला पाहिजे असे मांडण्यात आले होते. पण हे करतांना वनाच्या व्यापारासंबंधाच्या स्थानिक लोकांच्या वनावरील हक्काचे व सवलतीचे नियंत्रण करण्याची जरूरी आहे. असेही धूर्तपणाने प्रतिपादन केलेले होते. या ठरावात वनाचे चार गटात वर्गीकरण करण्यात आले.

एक : हवामानाच्या आणि भूमिच्या संरक्षणासाठी आवश्यक ठरणारी वने.

दोन: व्यापारी दृष्टीने मौल्यवान लाकूड पुरवठा करणारी वने.

तीन: गौण/दुय्यम वने आणि

चार : चराऊ जमिनीची वने

वनसंवर्धनापेक्षा शेती अधिक महत्वाची असून त्यासाठी आवश्यक ती वनजमीन हरकत न घेता उपलब्ध करून द्यावी असे या ठरावात म्हटले आहे. मुख्यत्वेकरून शासनाच्या व्यवस्थापनाखाली असलेल्या वनासंबंधीच्या तरतुदी या ठरावात होत्या. मात्र काही तरतुदी शासनाच्या नियत्रंणाखाली नसलेल्या वन जमिनीसंबंधीही होत्या. वनापासून मिळणाऱ्या महसुलात वाढ करण्याची आवश्यकता या ठरावात नमूद केलेली होती.

**महात्मा फुलेंची सडेतोड टिका**

शेतकऱ्यांवर घोर अन्याय अत्याचार करणाऱ्या ब्रिटिश सरकारची वननीती आणि वन कायद्याबाबत शेतकऱ्यांचा आसूड मध्ये सडेतोड टीका महात्मा फुले यांनी केली आहे.

पूर्वी ज्या शेतकऱ्यांजवळ थोडी शेती असत व ज्यांचा आपल्या शेतीवर निर्वाह होत नसे, ते आसपासचे डोंगरावरील, दऱ्याखोऱ्यातील जंगलातून उंबर, जांभूळ वगैरे झाडांची फळे खाऊन व पळस, मोहा इत्यादी झाडांची फुले, पाने आणि जंगलातून तोडून आणलेल्या लाकूडफाटया विकून पट्टीपासोडीपुरता पैसा जमा करीत व गांवचे गायरानाचे भिस्तीवर एक दोन गाया व दोनचार शेरड्या पाळून त्याच्यांवर जेमतेम गुजारा करून मोठ्या आनंदाने आपआपल्या गावीच रहात असत. परंतु आमचे मायबाप सरकारचे कारस्थानी युरोपिअन कामगारांनी आपली विलायती अष्टपैलू अक्कल सर्व खर्ची घालून भले मोठे टोलेजंग जंगलखाते नवीनच उपस्थित करून त्यामध्ये एकंदर सर्व पर्वत डोंगर, टेकड्या, दरीखोरी व त्याचे भरीस पडीत जमीन व गायराने घालून फॉरेस्टखाते शिखरास नेल्यामुळे दीनदुबळ्या पंगु शेतकऱ्यांचे शेरडा करडास या पृथ्वीचे पाठीवर रानचा चारासुद्धा खाण्यापुरती जागा उरली नाही.

महात्मा फुले

शेतकऱ्यांचा आसूड

**भारतीय वन कायदा १९२७**

१८८७ नंतर वनापासून मिळणाऱ्या सरकारी महसुलात वाढ होत गेली. जास्तीत जास्त महसूल कमावणे हे वनखात्याचे उद्दिष्ट बनले. बनीया ब्रिटिश सरकारने वनाचे व्यापरीकरण केले. १९२७ मध्ये सरकारने भारतीय वनकायदा केला. सरकारने वनांवरील आपली पकड आणखीनच घट्ट केली. १८७८ च्या कायद्यातील आरक्षित वने, संरक्षित वने व ग्रामवने ही वर्गवारी १९२७ च्या कायद्यात कायम ठेवण्यात आली. परंतु या वनांवरील लोकांच्या हक्कात कपात केली, ते हक्क न ठेवता त्यांना सवलतीचे स्वरूप दिले. या कायद्यातील प्रकरण पाच मध्ये खाजगी मालकीच्या जमिनी देखील वनांच्या व्यवस्थापनासाठी नियंत्रणाखाली घेण्याची तरतूद केली. या कायद्यात वेगवेगळ्या राज्यसरकारांनी सुधारणा केल्या आहेत.

**राष्ट्रीय वननीती १९५२**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर भारत सरकारने १९५२ मध्ये राष्ट्रीय वननीतीचा ठराव केला. विशेष म्हणजे परक्या ब्रिटिश सरकारने १८९४ मध्ये जारी केलेल्या मुद्दयाचाच त्यामध्ये समावेश होतो. वनांचा वापर प्रमुख राष्ट्रीय गरजा भागविण्यासाठी केला गेला पाहिजे असे त्यात नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात राष्ट्रीय हित याचा अर्थ संकुचितपणे लावण्यात आला. परिणामी रस्ते, धरणे, जल विद्युत प्रकल्प, संरक्षण विषयक प्रकल्प यासाठी वनजमिनींचा मुक्त हस्ताने वापर करण्यात आला. कागद, रेयॉन, आगपेट्या वगैरे लाकूड वापरणाऱ्या उद्योगधंद्याना अगदी नाममात्र दराने वन उत्पादनांचा पुरवठा करण्यात आला. आणि या सर्व गोष्टी करतांना वनात रहाणारे व वनांवर सर्वस्वी अवलंबून असणाऱ्या आदिवासी व इतर रहिवाशांच्या कल्याणाकडे साफ दुर्लक्ष झाले.

१९६० साली राष्ट्रपतींनी श्री ढेबर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अनुसूचित विभाग आणि अनुसूचित जमाती आयोगाच्या अहवालात भारत सरकारच्या १९५२ च्या वननीतीवर ज़ोरदार टीका करण्यांत आली. एकेकाळी वनांवर असलेल्या हक्काचे नंतर केवळ मेहेरबानी असे स्वरूप जाणिवपूर्वक देण्यात आले. वनखात्याने १९५२ साली जाहीर केलेली वननीतीही अंमलात आणली नाही. कारण या वननीतीप्रमाणे कायदाच करण्यांत आला नाही. जुना ब्रिटिश कालीन १९२७ चा कायदाच चालू ठेवण्यांत आला. वननीतीत आणि वन कायद्यात आदिवासींच्या कल्याणाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे असे आयोगाने आपल्या अहवालात नमूद केलेले आहे.

### राष्ट्रीय शेतकी आयोग

१९७६ साली भारत सरकारने शेती संबंधीच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी एक राष्ट्रीय आयोग नेमला. आयोगाच्या अहवालातील नवव्या खंडात वन विषयांचा विचार केलेला आहे. सर्वात नवलाची आणि खेदाची गोष्ट म्हणजे या आयोगाने वन जमिनींचा प्रमुख उपयोग उद्योगधंद्यांना लागणारे लाकूड निर्माण करणे हा आहे. असे प्रतिपादन केले आहे. तसेच वनांवरील लोकांचे अधिकारात कपात केली पाहिजे असे प्रतिपादन केले आहे. आणि त्यासाठी भारतभर लागू असणारा दुरूस्त वनकायदा अंमलात आणावा असेही आयोगानी आपल्या अहवालात नमुद केलेले आहे.

### वन संरक्षण कायदा १९८०

१९७६ च्या भारतीय राज्यघटनेतील ४२ व्या घटना दुरूस्तीनंतर केंद्र सरकारने वन संरक्षण अध्यादेश काढला. या अध्यादेशाने राज्यसरकारांना आरक्षित वने आरक्षणातून मोकळी करण्यास प्रतिबंध करण्यात आला. तसेच वनसंवर्धनाखेरीज इतर कोणत्याही कारणासाठी केंद्र सरकारच्या पूर्व परवानगी शिवाय कोणत्याही वनजमिनी देण्यास राज्यसरकांवर बंदी घालण्यांत आली. या अध्यादेशाचे पुढे कायद्यात रूपांतर झाले. १९८८ साली १९८० च्या कायद्यात दुरूस्ती करणारा वन(संरक्षण) कायदा करण्यांत आला. या दुरूस्तीने वन जमिनी कोणत्याही प्रकारे खाजगी व्यक्तींना अथवा कंपन्यांना केंद्र सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय देण्यास राज्य सरकारांना मनाई करण्यांत आली. १९८० च्या कायद्यातील तरतूदी १९८८ च्या दुरूस्तीने अधिक कडक करण्यांत आल्या. १९५२ च्या वननीतीप्रमाणे नवीन कायदा तर करण्यांत आला नाहीच पण १९२७ चा ब्रिटिश सरकारनी केलेला भारतीय वन कायदा १९८० आणि १९८८ च्या वन संरक्षण कायद्यानी जबरदस्त कडक करण्यांत आला आहे राज्यसरकाराचे वनजमिनीवरील सर्व अधिकार काढून घेऊन ते केंद्र सरकारच्या पर्यावरण आणि वन खात्यांकडे आता सुपूर्त करण्यांत आले आहेत.

### लोकाभिमुख वन धोरण

ग्रामीण विशेषतः आदिवासी जमातीच्या सक्रीय सहभागाशिवाय वनसंरक्षण आणि वन संवर्धन होऊ शकणार नाही याची उशिरा का होईना चांगलीच जाणीव भारत सरकारला झाली तेव्हा वनधोरणाबाबतचा ठराव १९८८ मध्ये लोकसभेत मांडण्यात आला. तो मंजुरही झाला.

या वनधोरणामध्ये खालील प्रमुख बाबींचा पुरस्कार केलेला आहे.

अ) वनापासून मिळणारा आर्थिक लाभ दुय्यम समजणे.

ब) वनात किंवा वनाजवळ रहाणाऱ्या आदिवासी

बिगर आदिवासी लोकांचे वनावरील हक्क व सवलतींचे रक्षण करणे.

क) वनाशी निगडीत असलेल्या सर्व यंत्रणांनी आदिवासींच्या वन संरक्षणातील आणि वन विकासातील सहभाग वाढविणे

ड) पर्यावरणाचे संरक्षण करणे.

इ) उद्योगधंद्यांना अती सवलतीच्या किंमतीने वनोत्पादने विकण्याच्या योजना बंद करणे,

फ) देशातील एक तृतियांश भूमी वृक्षाच्छादित करणे, त्यासाठी वनसंवर्धनाची मोहिम चालवणे.

**रिओ परिषदेचा जैविक विविधता करार**

रिओ येथे १९९२ मध्ये आंतरराष्ट्रीय परिषद झाली. तेथे जैविक विविधता करार करण्यात आला. हा करार तयार करण्यात भारताचा पुढाकार होता. या करारात असे नमूद केले आहे की, शतकानुशतके जैविक विविधतेचे संरक्षण आदिवासी जमातीने केलेले आहे. तेंव्हा या संसाधनावर त्यांचा हक्क आहे. या संसाधनाच्या सततच्या संरक्षणात त्यांचा सहभाग असला पाहिजे. साहजिकच वनधोरणाचा तसेच वनधोरण अंमलात आणण्यासाठी नवीन केलेल्या वनविधेयकाचा वन संरक्षणावर आणि वनात आणि वनाजवळ राहणाऱ्या आदिवासी जमातीवर आणि बिगर आदिवासी समाजांवर काय परिणाम होतील याचा विचार अपरिहार्यपणे क्रमप्राप्त ठरतो.

१९८८ मध्ये भारत सरकारने जाहीर केलेली वननीती आणि १९९५ मध्ये रिओ येथील परिषदेमध्ये मंजूर झालेल्या जैविक विविधता कराराचा एकत्रित विचार केला तर खालीलप्रमाणे वनविषयक धोरणाचे सूत्र असले पाहिजे.

१) जंगलाचा नाश म्हणजे उद्याचा आपला नाश हे ध्यानात घेऊन जंगले त्यातील जीवसृष्टी व नैसर्गिक पर्यावरणाचा समतोल टिकवला पाहिजे.

२) जंगल वाढीत व संवर्धनात स्थानिक लोकांचा सहभाग अत्यावश्यक

३) ग्रामीण जनता व आदिवासी जंगलावर अवलंबून असतात. शेकडो वर्षे त्यांनी वने राखली आहेत. तेव्हा त्यांचे जंगलावरील हक्क मान्य केले पाहिजेत.

**नवीन वन कायदा नाही.**

१९८८ चे वनधोरण अंमलात आणायचे असेल तर त्यासाठी नवीन वनकायदा केंद्र सरकारने केला पाहिजे. परंतु नवीन वन कायदा १९ वर्षे होऊन गेली तरी २००४ पर्यत करण्यांत आलेला नाही. आजही परक्या ब्रिटिश सरकारनी केलेला कालबाह्य १९२७ चा भारतीय वन अधिनियमाप्रमाणे वनाचे व्यवस्थापन करण्यात येत आहे. १९९४ मध्ये भारत सरकारने वन कायद्याचा मसुदा तयार केला होता. पर्यावरण आणि वनखात्याचे मंत्री त्यावेळी श्री. कमलनाथ होते.

गेल्या दशकांत या दिशेने खरे पहाता आम्ही खूप प्रगती केली आहे. वनीकरण ही जनचळवळ बनवण्याबद्दल पंतप्रधान राजीव गांधी १९८५ मध्ये खूप उत्साहानी बोलत होते. १९८८ मध्ये वननीती ठरविण्यात आली. या नव्या दृष्टीकोनाचा हिरिरीने पुरस्कार या वन धोरणामध्ये करण्यांत आला आहे. स्थानिक जमातीबरोबरची वनाच्या संयुक्त व्यवस्थापनाची पध्दती शासनाने १९९० मध्ये अंगीकारली आणि त्याला मूर्त स्वरूपही दिले. अपेक्षा ही होती की याच दिशेने जाणारा नवीन वनविधेयकाचा मसुदा असावा.

पण वनाच्या संयुक्त व्यवस्थापनाचा साधाग उल्लेखही या मसुद्यात नाही. गाववने व पर्यावरण, संरक्षण या कल्पनांचा शाब्दिक फुलोरा या मसुद्यात आढळून येतो हे नुसते दाखवायचे दात आहेत. प्रत्यक्षात या दोन्हीबाबतच्या तरतुदी पुच्छ प्रगतीच घडविणार आहेत.

आदिवासी, दलित, भटके विमुक्त वगैरे जंगलवासीय जंगलाचे शत्रू आहेत. त्यांच्यामुळे जंगलाचा नाश होतो ही जंगलखात्याची दृढ भावना होती. स्वातंत्र्यानंतर ५६ वर्षे झाली आहेत. पण वनाधिकाऱ्यांची ही भावना व वृत्ती बदललेली नाही. लोकांच्या मदतीची, सहभागाची त्यांना म्हणूनच ॲलर्जी आहे. लोकांची मदत, सहभाग म्हटला म्हणजे त्यांच्यावर बंधने येतात. त्यांच्या अंगावर काटा उभा राहातो. कर्तव्य पार पाडले नाही तर लोक विचारतील ही भीती असते. लोकांच्या नजरेखाली काम करावे लागते. चुकारपणा करता येत नाही. मोकळेपणाने भ्रष्टाचार करता येत नाही. थोडक्यात जंगलवासीयांची मदत, सहकार्य, सहभाग जंगल खात्याला नको आहे अर्थातच मग राज्य सरकारला आणि केंद्र सरकारलाही तो नको आहे. नोकरशाही वृत्तीचा वरचष्मा नवीन वनविधेयकावर आहे. लोकांवर अविश्वास आणि नोकरशाहीवर भरवसा तेव्हा लोकांचा हस्तक्षेप असता कामा नये. जंगलाचा लाभ आणि उपयोग जंगलवासियांना होता कामा नये. हाच जुनाट सूर वन विधेयकाच्या मसुद्यातून प्रकर्षाने जाणवतो. १९८८ च्या वननीतीशी पूर्णपणे विसंगत असे हे विधेयक आहे.

हे प्रतिगामी वनविधेयकही लोकसभेपुढे मांडण्यात आले नाही ते बारगळले. त्यालाही आता १० वर्षे झाली आहेत. परक्या ब्रिटिश राजवटीत लॉर्ड डलहौसीने १८७७ साली ब्रिटिश सरकारची वननीती जाहीर केली. आणि ती अंमलात आणण्यासाठी १८७८ मध्ये दुसऱ्याच वर्षी कायदा केला. १८७८ चा कायदा १९२७ मध्ये अधिक कडक करण्यांत आला. म्हणजे अधिक जनता विरोधी, आदिवासी विरोधी करण्यांत आला. आजही तोच कालबाह्य कायदा अंमलात आहे. थोडक्यात डलहौसीने जाहीर केलेल्या १८७७ च्या वन नीतीनंतर १११ वर्षांनी १९८८ मध्ये भारतीय लोकसभेनी मंजूर केलेले वनधोरण निव्वळ कागदावरील शोभेचा प्रचारी दस्तऐवज ठरला आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचा उठसूठ वारसा सांगणाऱ्या केंद्र सरकारला आणि महाराष्ट्र सरकारला हे शोभणारे नाही. परिणामी लॉर्ड डलहौसी यांनी म्हणजे परक्या लुटारू व्यापारी ब्रिटिश सरकारची जनता विरोधी, आदिवासी विरोधी, भ्रष्टाचारी नोकरशाहीची धन करणारी ब्रिटीश वननीती व कायदा आजही अंमलात आहे असे मानावे लागेल.

■ ■ ■

# 'क' ठाकूर जात पंचायतीचे विवाहविषयक नियम

- पुरूषोत्तम आगाशे

भारतीय समाज हा 'अठरा पगड जातींनी 'बनलेला आहे. जाती कशा तयार झाल्या, केव्हापासून तयार झाल्या. इतक्या जाती का निर्माण झाल्या या प्रश्नांची उत्तरे देणं तसं अवघडच. विविध अभ्यासकांनी हा विषय अभ्यासला आहे, आणि आपआपल्या परीनं वरील प्रश्नांना उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी अनेक प्रमेयदेखील मांडण्यात आली आहेत. आजही या विषयावर संशोधन चालूच आहे.

आदिवासींमध्ये देखील आपल्याला अनेक जमाती असल्याचे दिसून येते. प्रत्येक जमातीची काही खास अशी वैशिष्ट्ये आहेत. भौगोलिक व सांस्कृतिक वैशिष्ट्यांमुळे प्रत्येक जमातीचे वेगळेपण उठून दिसते.

भारतातील जाती व जमातींचा निश्चित आकडा सांगणे हे तसे कठीणच. मात्र प्रत्येक जातीजमातीने आपआपले वैशिष्ट्य जपून ठेवले आहे. या वैशिष्ट्यापैकी एक वैशिष्ट्य म्हणजे जात पंचायत.

आपल्या समाजातील जे काही भांडणतंटे , हेवेदावे असतील ते समाजातील बुजुर्ग पंचमंडळींच्या मदतीने सोडवावेत हे जात पंचायतीचे मुख्य काम. फार पूर्वीपासून न्यायदानाचे काम जातपंचायतीने केले आहे. त्यायोगे स्वत:चा समाज (जात किंवा जमात) एकसंध ठेवण्याचे महत्वाचे काम या जात पंचायतींनी केले आहे.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर या जातपंचायतीला उतरती कळा लागू लागली. ब्रिटिशांनी स्वत:चे कायदे करून वेगळी न्याययंत्रणा विकसित केली. त्यामुळे पारंपारिक जातपंचायत व ब्रिटिश न्याययंत्रणा यामध्ये संघर्ष उद्भवू लागला.

काळाच्या ओघात अनेक जातीजमातीतील पारंपारिक जातपंचायती लोप पावत गेल्या. स्वातंत्र्यानंतर सरकारी न्याययंत्रणा अधिक विकसित व प्रबळ होत गेली. मात्र या रेट्यापुढे देखील काही समाजातील जात पंचायती टिकून राहिल्या आहेत. आदिवासी व भटक्या विमुक्तांच्या जात पंचायती हे त्याचे बोलके उदाहरण आहे.

प्रस्तुत लेखामध्ये 'क 'ठाकूर समाजाची जात पंचायत व तिने केलेले विवाहविषयक नियम याचा मुख्यत्वे विचार करण्यात आला आहे.

'क' ठाकूर हा आदिवासी समाज ठाणे जिल्हयातील जव्हार, मोखाडा भागात मोठ्या संख्येने आढळून येतो. या समाजाची या भागात अंदाजे ९०,००० लोकसंख्या आहे.

'क 'ठाकूर समाजात जात पंचायत फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. समाजातील लोकांमध्ये आपसात होणारे भांडणतंटे, कौटुंबिक वादविवाद, स्त्री-पुरूष संबंधातील वाद यासारख्या प्रकरणांमध्ये मध्यस्थी करून वादविवाद मिटवण्याचे काम ही जात पंचायत करत आलेली आहे.

या जातपंचायतीची रचना देखील वैशिष्टयपूर्ण असे. एखादा वादविवाद गावात उद्भवल्यास सर्वप्रथम गावातील पंचाकडे त्याची तक्रार केली जात असे. हा वाद मिटवण्यासाठी गावातच बैठक घेतली जात असे. या बैठकीला गावातील पंच, वाद असलेल्या दोन्ही बाजू व गावकरी जमत. गावातील अनुभवी, बुजुर्ग मंडळीच

पंच म्हणून काम पहात. पंच मंडळी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेत व आपसात चर्चा करून तोडगा सुचवत. तोडगा दोन्ही बाजूंना मान्य झाल्यास प्रकरण तिथेच मिटत असे.

पंचांचा निर्णय एखाद्या बाजूस मान्य न झाल्यास प्रकरण निवाडयासाठी पुढे पाठवले जात असे, आसपासच्या गावातील पंच मंडळी एकत्र येऊन प्रकरण ऐकून तोडगा सुचवत. पूर्वीच्या काळी 'काज 'या धार्मिक विधी प्रसंगी अशी प्रकरणे निकालात काढली जात असत.

अशा प्रकारे 'क ' ठाकूरांची जात पंचायत काम करत असे. मात्र काळ बदलला तसतसा बदल जातपंचांयतीत होऊ लागला आहे. 'क' ठाकूर सुद्धा याला अपवाद नाहीत.

ठाणे जिल्ह्यातील क ठाकूर समाजाने आपली जात पंचायत आदिवासी हिंदु 'क' ठाकूर समाज उन्नती मंडळ या नावाने संस्था म्हणून अधिकृतरित्या नोंदवली आहे. या संस्थेची नोंदणी ५ डिसेंबर २००० रोजी झाली. संस्थेचा कार्यभार पहाण्यासाठी अकरा सदस्यांची एक समिती पण निवडण्यात आली आहे.

समाज मंडळाचा कारभार नीटपणे चालावा म्हणून भौगेलिक विभागानुसार चार गट पाडण्यात आले आहेत. ते पुढीलप्रमाणे – कोरतड, विनवळ, न्याहाळा, विक्रम गड.

समाजातील भांडणतंटे सोडविण्यासाठी आजही सर्वप्रथम गावपातळीवरच प्रयत्न केले जातात. तेथे भांडण न मिटल्यास गट प्रमुखाकडे प्रकरण पाठवले जाते. तेथेही भांडण मिटले नाहीतर समाज मंडळाच्या मुख्य समितीकडे प्रकरण निवाड्यासाठी येते व निर्णय दिला जातो.

समाज मंडळाकडे निवाड्यासंबंधी येणारी प्रकरणे मुख्यत्वे करून स्त्री पुरुष संबंधातीलच असतात.

'क' ठाकूर समाजात विवाहाला एक निश्चित वळण मिळावे, अनिर्बंध वर्तणुकीला आळा बसावा म्हणून समाजाने लग्न व साखरपुड्याचे नियम तयार केले आहेत. त्याचा तपशील पुढे दिलेला आहे.

'क 'ठाकूर आदिवासी समाजातील
लग्न व साखरुपुडा नियम

*साखरपुड्याचे नियम*

मुलामुलीने एकमेकांना पसंत केल्यानंतर दोन्ही बाजूची वरिष्ठ मंडळी एकत्र येऊन साखरपुडा व लग्नाचा तपशील ठरवतात.

साखरपुड्याच्या खर्चापोटी ठराविक रक्कम वरपक्षाकडून वधुपक्षाला दिली जाते. साखरपुडयात होणाऱ्या विधींची दखल घेऊन 'क' ठाकूर समाज उन्नती मंडळाने साखरपुड्यात द्यायची रक्कम निश्चित केली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:–

| | |
|---|---|
| साखरपुड्याचा बस्ता | रू. ६०१/– |
| बोल मागणे | रू. २५/– |
| मोठी पेण | रू. ५१/– |
| साखरपुड्याच्या गाठी | रू. ५१/– |
| गाठी घालणे | रू. २५/– |
| नातेवाईक | रू. २५/– |
| बस्ता बांधणे स्त्री पुरूष | रू. ५१/– |
| वधुकडून स्त्री पुरूष | रू. ५१/– |
| फडकी लावण्यासाठी स्त्रिया | रू. २५/– |
| ओटी भरणे | रू. २१/– |
| कुरमुरे व साखर | रू. ७५/– |
| एकूण | रू.१००१/– |

## लग्नाचे नियम

साखरपुडयाप्रमाणेच लग्नातदेखील किती खर्च वर पक्षाने वधुपक्षाला द्यायचा याचे नियम समाज मंडळाने तयार केले आहेत.

'क' ठाकूर समाजात इतर आदिवासींप्रमाणे 'देज' देण्याची पध्दत आहे. हा देज पुढीलप्रमाणे असतो:-

तांदूळ १ क्विंटल, कडधान्य-उडीद किंवा तूर २ पायली, धान्य सोडण्यसाठी २० रूपये.

याशिवाय वधुपक्षाला एकूण १४५१ रूपये द्यावे लागतात. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:-

| | |
|---|---|
| लग्नाचा बस्ता | रू. ८००/- |
| लग्नाचे देज पान | रू. २५०/- |
| बस्ता बांधणे स्त्री पुरूष | रू. १०१/- |
| गावकऱ्यांसाठी | रू. २१/- |
| पाटील शेला | रू. १०/- |
| मामा शेला | रू. ११/- |
| लग्नाचे पातळ बांधण्यासाठी स्त्रिया | रू. २५/- |
| लग्नाच्या गाठ्या | रू.१०१/- |
| लग्नाचा चुडा | रू. ५१/- |
| सुवासिनी पाच | रू. २५/- |
| मांडव घालणारे | रू. ५/- |
| मेडिंगा (ब्राह्मण) | रू ५१/- |
| | -------- |
| एकूण | रू.१४५१/- |
| | -------- |

## मोहतुरीचे नियम

'क' ठाकूर समाजात पुनर्विवाहाला पूर्णपणे संमती असते. घटस्फोटित अथवा/ विधुर झालेली व्यक्ती दुसरा जोडीदार निवडून त्याच्याशी संसार करू शकते.

'क 'ठाकूर समाजातील परंपरेनुसार पुरूष कितीही वेळा विवाह करू शकतो (हळद लावून घेऊ शकतो) तर स्त्री मात्र एकदाच विवाह करू शकते. (पहिल्या लग्नातच हळद लावून घेऊ शकते) स्त्रीने दुसरे वा तिसरे लग्न केले तर तिला लग्नात हळद लावली जात नाही. अशा लग्नाला 'पाट लावणे ' किंवा 'मोहतुर 'असेही म्हणतात.

'क' ठाकूर समाज उन्नती मंडळाने मोहतुरीसाठी पण देण्याघेण्याचे नियम केले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| मोहतुरीचा बस्ता | रू. ५५१/- |
| नवरीचा ठराव | रू. २०/- |
| मोहतुरी गाठी | रू. ५०/- |
| नातेवाईकांसाठी | रू. २५/- |
| गावकऱ्यांसांठी | रू. २५/- |
| बस्त्यासाठी जाणारे स्त्री पुरूष | रू. ५०/- |
| नवरी घेऊन जाणाऱ्या स्त्रिया | रू. ३०/- |
| | -------- |
| एकूण | रू. ७५१/- |
| | -------- |

साखरपुडा , लग्न व मोहतुरीच्या नियमांमधून एक गोष्ट दिसून येते ती म्हणजे या सर्व धार्मिक विधींमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींना मान म्हणून काही ठराविक रक्कम देण्यात यावी. साखरपुड्यात बोल मागणाऱ्यांसाठी, गाठी (मंगळसूत्र) घालणाऱ्यांसाठी तसेच बस्ता बांधण्यासाठी येणाऱ्या वऱ्हाडासाठी; लग्नामध्ये गावकरी, गावचा पाटील, मामा, सुवासिनी, लग्न लावणारा मेडिंगा तसेच मांडव घालणारे वगैरे. या सर्व व्यक्तींचा मानसन्मान योग्य रीतीने व्हावा या हेतूने ठराविक रक्कम ठरवण्यात आली आहे.

पूर्वीच्या काळी हा मानसन्मान पैशाच्या स्वरूपात न होता दारूच्या रूपाने होत असे. जसे लग्नाच्या गावकऱ्यांना चार बाटल्या, लग्नात वधूला पातळ लावणाऱ्या स्त्रियांना दोन बाटल्या दारू वगैरे.

'क 'ठाकूर समाजातील साखरपुडा व लग्न समारंभांना एक वेगळे वळण लागावे, पूर्वापार चालत आलेल्या अनिष्ट प्रथांना आळा बसावा, 'देज' व इतर देण्याघेण्याच्या खर्चाला आळा बसावा, लग्नात अवाजवी खर्च होऊ नये, समाजातील गरीब श्रीमंतीचे भेद कमी व्हावेत या हेतूने' क' ठाकूर आदिवासी समाज उन्नती मंडळाने साखरपुडा व लग्नातील खर्चाचे नियम तयार केले आहेत. हे नियम जानेवारी २००१ पासून अस्तित्वात आले आहेत. याशिवाय साखरपुडा व लग्नाचे इतर नियम पण तयार करण्यात आले आहेत त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:-

१) साखरपुडा झालेल्या मुलीचे लग्न जास्तीत जास्त १ वर्षापर्यंत झालेच पाहिजे. जर १ वर्षापर्यंत लग्न केले नाही तर त्या मुलीवर नवऱ्याचा हक्क रहाणार नाही व त्या मुलीस दुसरा नवरा करण्यास परवानगी देण्यात येईल. मात्र नवऱ्यास दावा किंवा झालेला खर्च मिळणार नाही.

२) ज्या मुलीचा/ मुलाचा साखरपुडा झालेला असेल व नवरा/ नवरी लग्न करण्यास तयार असून त्या मुलीने/ मुलाने दुसरा नवरा/ नवरी केला तर मुलीकडून नवऱ्याचा खर्च रू २५०० /- व समाजाचा फंड रू. १०१/- असे एकूण रू.२६०१ /-घेण्यात येतील तसेच आई वडिलांकडून रू. १०५१ /-फंड घेण्यात येईल.

३) नवरी मुलीची पेण दिली असेल तर त्याच वर्षी साखरपुडा केला पाहिजे. त्याच वर्षी केला नाही तर मुलीवर नवऱ्याचा हक्क रहाणार नाही.

४) ज्या मुलीचे लग्न झाले असेल व नवरी मुलगी नवऱ्याकडे नांदत असताना त्याने स्वत: खुशीने नवरीस सोडले ,तर नवऱ्यास दावा न मिळता फक्त फारकत देण्यात येईल.

५) ज्या मुलीचे लग्न झाले असेल वा नवरा नांदवित असून तिने दुसरा नवरा केला तर त्या नवऱ्याकडून पहिल्या नवऱ्याचा खर्च रू.५००० व समाजाचा फंड रू.१५१ /-असे एकूण रू.५१५१/- घेतले जातील व आईवडिलांकडून रू.१०५१ /-दंड वसूल करून घेतला जाईल.

६) ज्या मुलीस फारकत मिळाली असेल व तिने दुसरा नवरा केल्यास त्या नवऱ्याकडून साखरपुड्याचे रू.५२५ /-समाज फंड व

लग्नाची फारकत फंड रू १०५१/- भरावा लागेल.

७) ज्या मुलीस लग्नाची फारकत मिळाली असेल व तिने दुसरा नवरा केला व तोही सोडला आणि तिसरा नवरा केला , तर तिसऱ्याकडून दुसऱ्या नवऱ्याला रू. ५०००/-व रू. १५१/- समाजाचा फंड असे एकूण रू.१०५१/- फंड घेण्यात येईल.

८) ज्या मुलीचे मोहतुर लावले असेल व ती नवऱ्यास नांदत नसेल तर त्या नवऱ्याचा खर्च रू.१०००/- व समाज फंड रू. ५१/- असे एकूण रू.१०५१/- द्यावे लागतील.

९) जर एखाद्या पुरूषाने दुसऱ्याची नांदती बायको पळविली (पेटती चूल विझवली) तर त्याच्यावर समाजाचा फंड रू.२००१/- व नवऱ्याचा खर्च रू.८०००/ असे एकूण रू.१०००१ / रूपये घेतले जातील व आई वडिलांकडून रू.१०५१/- घेण्यात येतील.

१०) मोहतुरी नवरीकडून गावकऱ्यांनी पान सुपारीसाठी फक्त रू.२५/- घ्यावेत.

११) लग्न तीन दिवसात उरकले पाहिजे.

१२) लग्नासाठी मुलीचे वय १८ वर्षाचे व मुलाचे वय २१ वर्षाचेवर असावे.

१३) मुला-मुलीचे लग्न करण्यापूर्वी सरपंच व पोलीस पाटील यांच्याकडून वयाचा दाखला घ्यावा व 'क 'ठाकूर समाज संघटनेच्या गट कमिटी सेक्रेटरीकडे जाऊन रजिस्टरवर नोंद करावी. ज्या मुला/मुलीची नोंद केली नसेल त्याची तक्रार घेतली जाणार नाही.

१४) मुला/मुलीची नोंद न करता लग्न केले तर आई वडिलांवर रू.५०१ समाज फंड भरावा लागेल.

१५) वरील नियमांचा व अटींचा भंग व्यक्तीने अगर गावाने केल्यास त्यांना समाज, गावाबाहेर टाकून त्यांच्यावर बहिष्कार टाकण्यात येईल.

'लग्न व साखरपुड्याचे नियम'' क 'ठाकूर समाजाने छोट्या पुस्तिकेच्या रूपात प्रकाशित के ले असून या नियम पुस्तिका जव्हार व मोखाड्यात पसरलेल्या व समाजाची वस्ती प्राबल्याने असलेल्या गावागावातून वाट ण्यात आल्या आहेत. लग्न व साखरपुड्याच्या वेळेस या नियमांना अनुसरूनच देवाणघेवाण व्हावी अशी समाजातील पुढाऱ्यांची अपेक्षा आहे.

प्रस्तुत लेखकाने वर्ष २००० ते २००३ दरम्यान ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील 'क 'ठाकूर समाजाचे प्राबल्य असलेल्या खेडेगावात राहून समाजाचा अभ्यास केला. या अभ्यासातून काही गोष्टी ठळकपणे पुढे आल्या. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

'क 'ठाकूर समाजातील हल्लीच्या मुलामुलींना आपला जीवनसाथी निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असते. मुलगा व मुलगी एकमेकांना लग्न , बोहाडा, तारपा, नाच, जत्रा, यात्रा वगैरे प्रसंगी एकमेकांना भेटून, बोलून मग लग्न ठरवतात. एकमेकांचे जुळले की आपआपल्या पालकांना कल्पना दिली जाते. त्यानंतर मुलाचे पालक मुलीच्या पालकांकडे 'मागणे' घेऊन जातात. व लग्न ठरते.

पूर्वीच्या काळी (१५-२० वर्षापूर्वीपर्यंत) मुलामुलींना स्वत:चे लग्न स्वत:च ठरविण्याचे स्वातंत्र्य नव्हते.. मुलामुलींचे पालकच लग्न ठरवत. बोहल्यावर चढल्यानंतरच मुलाला मुलगी पहायला मिळत असते. त्याकाळी मुलाचे लग्न १४-१६व्या वर्षी तर मुलीचे लग्न १०-१२ व्या वर्षी होत असे.

'क' ठाकूर समाजात 'देज' (वधूमूल्य) देण्याची पद्धत असल्याने कधी कधी त्यावरून मुलीचा बाप आपली मुलगी देण्यास नकार देत असे वा जास्त 'देज' मागत असे. त्यावरून भांडणतंट्याचे प्रसंग होत. गरीब मुलांची लग्न होणे कठीण होऊन बसे. या सर्वांवर तोडगा काढण्यासाठी 'क' ठाकूर जात पंचायतीने साखरपुडा, लग्न व मोहतुरीचे नियम बनविले.

अभ्यास केलेल्या खेड्यामध्ये या नियमांना अनुसरूनच लग्न व साखरपुड्याच्या देवाणघेवाण होत असल्याचे दिसून आले. अशा प्रसंगी गावातील मुख्य पंच मंडळी नियम पुस्तिकेचा आधार घेतल्याचे पहायला मिळाले. या नियम पुस्तिकेमुळे साखरपुडा वा लग्नाचा व्यवहार अगदी सोपा झाला असल्याचे गावातील लोकांनी सांगितले.

इतर नियमांच्या बाबतीत मात्र पूर्णपणे वेगळेच चित्र पहायला मिळते.

देशाच्या अन्य ग्रामीण भागाप्रमाणेच विवाहाच्या कायदेशीर वयाचे पालन केले जात नाही. सर्वसाधारणपणे आजही मुलीचा विवाह १४-१५व्या वर्षी तर मुलाचा विवाह १६-१७ व्या वर्षी केला जातो.

शासनाच्या कायद्याप्रमाणे तसेच जातपंचायतीच्या नियमाप्रमाणे लग्नाचे वय पाळणारी कुटुंबे अगदीच बोटावर मोजण्याइतकीच किंवा जवळजवळ नाहीच म्हटलं तरी चालेल.

नियमांमध्ये सरपंच व पोलिस पाटील, याच्यांकडून वयाचा दाखला घेण्यासंबंधी सुचवले आहे. तसेच 'क' ठाकूर समाजसंघटनेकडे अशा विवाहाची नोंद करण्यासंबंधी सुचवले आहे. मात्र वरील कोणत्याही बाबींची पूर्तता 'क 'ठाकूर समाजातील लोक करत असल्याचे अभ्यासात दिसून आले नाही.

गावामध्ये अशी अनेक उदाहरणे घडली आहेत की मुला -मुलीचे प्रेम जमले , ती दोघं एकत्र राहून संसार करायला लागली आणि मूल देखील झालं. काही कुटुंबामध्ये साखरपुडा झाल्यानंतर मुलगी सासरी नांदायला आली. लग्न वर्षा-दोन वर्षानंतर मूल झाल्यावर झालं.

वरील गोष्टींसाठी जात पंचायतीने कोणतेच नियम केलेले नाहीत. मात्र अशा गोष्टींना समाज मान्यता असल्याचे दिसते.

लग्न झालेला मुलगा वा मुलगी एकमेकांपासून फारकत घेऊन दुसरा जोडीदार निवडतात. अशी अनेक उदाहरणे अभ्यास केलेल्या गावातून दिसून आली मात्र त्यावेळेस आकारण्यात आलेल्या दंडाची रक्कम वा समाज फंडाची रक्कम याबाबतचे नियम पाळले गेले नसल्याचे दिसून आले.

'क' ठाकूर समाजामध्ये एका पुरूषाने दोन वा अधिक स्त्रियांशी लग्न करण्यास परवानगी असते व त्याला समाजाची मान्यताही मिळते. मात्र अशा पुरूषाने दोन वा अधिक स्त्रियांशी लग्न करू नये यासाठी जात पंचायतीने कोणतेही नियम बनवलेले नाहीत.

वरील चर्चेवरून असे म्हणता येईल की 'क' ठाकूर समाजाच्या विवाह, स्त्री-पुरूष संबंध याविषयीच्या चालीरीती प्रथा -परंपरा, 'मुख्य प्रवाह'

म्हणून समजल्या जाणाऱ्या जातीपेक्षा सर्वार्थाने भिन्न आहेत. त्यांचे खास असे वेगळेपण आहे. विवाह वा स्त्री-पुरूष संबंधाबाबत स्त्री असो वा पुरूष दोघांनाही निर्णय घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असल्याचे दिसते. यदा कदाचित भांडणतंटा झालाच तर तो जात पंचायतीच्या माध्यमातून सोडवला जातो.

या समाजातील विवाहाच्या चालीरीतींमध्ये असलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी जात पंचायतीने आता लिखित स्वरूपात नियम करून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. हे नियम परिपूर्ण आहेत. असे म्हणता येणार नाही मात्र त्यामुळे विवाह विषयक सुधारणांना चालना मिळणार आहे.

जसजसा अन्य सामाजिक क्षेत्रांमध्ये 'क' ठाकूर समाज प्रगती करत जाईल तसतसा या सुधारणांना अधिक गती प्राप्त होईल. त्यासाठी समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर आरोग्य, शिक्षण याविषयी जाणीव करण्याची गरज आहे.

'क' ठाकूर समाजाच्या जात पंचायतीने नोंदणीकृत संस्था काढून त्याद्वारे आपल्या समाज बांधवांमध्ये सामाजिक परिवर्तन करण्यासाठी जो पुढाकार घेतला आहे त्याचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. अन्य आदिवासी जमातींमध्ये जर का समाजातील लोकांनी असाच पुढाकार घेतला तर आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक सुधारणांना निश्चितच गती मिळू शकेल.

■ ■ ■

## लेखकांसाठी

आपण स्वत: आदिवासी आहात? आपल्याला आदिवासींच्या संदर्भात लेखन करावेसे वाटते ? कविता कराव्याश्या वाटतात? आदिवासींच्या समस्या मांडाव्याशा वाटतात? आदिवासी संस्कृतीची ओळख इतरांना करून द्यावीशी वाटते? आदिवासींकडे असलेल्या पारंपारिक ज्ञानाचा खजिना इतरांपुढे मांडावासा वाटतो?

या प्रश्नांचे उत्तर 'होय' असेल तर मग उचला लेखणी आणि लागा कामाला. आपले साहित्य 'हाकारा' त्रैमासिकाकडे पाठवून द्या. आपले स्वागतच होईल. शब्द मर्यादा, विषय ,भाषा वगैरेचे कोणतेही बंधन नाही. अट फक्त एकच लेखनातून व्यक्तिगत टीका होऊ नये वा कोणच्याही भावभावना दुखावल्या जाऊ नयेत.

आपण पाठविलेले साहित्य संपादक मंडळापुढे ठेवण्यात येईल. संपादक मंडळाची संमती मिळाल्यावर त्या साहित्यास हाकारातून प्रसिध्दी देण्यात येईल. साहित्य पाठविण्याचा पत्ता-

*संपादक*
*हाकारा त्रैमासिक*
*महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद*
*६४, आनंद पार्क, औंध, पुणे ४११००७*

# मेळघाटातील कोरकू आदिवासी

- डॉ. धैर्यशील शिरोळे

आपला महाराष्ट्र हा एक मोठा भूप्रदेश आहे. त्यात भौगोलिक,ऐतिहासिक , सामाजिक आणि आर्थिक विविधता आहे. शहरवासीयांचा ह्या भागांशी संबंध येत नसल्याने हे भाग अपरिचित राहतात. असाच एक प्रदेश म्हणजे अमरावती जिल्ह्याच्या उत्तरेस असलेला मेळघाट हा प्रदेश होय. चिखलदरा आणि धारणी हया दोन तालुक्यात हा भाग आहे. त्यात सातपुडा पर्वताच्या रांगा असून पाती, सिपना, गडगा, पूर्णा आणि पेढी या नद्यांनी तो व्यापलेला आहे. सागवानाची जंगले येथे मोठ्या प्रमाणावर आढळतात आणि हया भागातील मेळघाट व्याघ्रप्रकल्प वन्य पशूंच्या खास संरक्षणासाठी उभारला गेला आहे. पेढी नदीच्या काठी वसलेल्या वलगाव येथे श्री संत गाडगेमहाराजांची समाधी आहे. अमरावतीहून अचलपूर, परातवाडा, धारणीमार्गे जाणारा रस्ता मध्यप्रदेशातील बऱ्हाणपूर गावावरून इंदोरला राष्ट्रीय महामार्गाला मिळतो.

मेळघाटात मुख्यत्वेकरून मुंडा वंशाचे कोरकू हे आदिवासी राहतात. हे लोक त्यांची उत्पत्ती चौहान ह्या रजपूत वंशापासून झाल्याचे सांगतात. त्यांच्यांत मोवासी, बावरिया, रूमा आणि बोंडई ह्या चार पोट जाती आहेत. गोंड आदिवासींशी त्यांचा निकटचा संबंध आल्याने त्यांच्यात बरेच साधर्म्य आढळते. मेळ घाटातील कोरकू स्वत:ला रावणाचे वंशज समजतात. काहींच्या मते ते महाभारतातील कौर्मवंशी राजांचे वंशज आहेत.

पूर्वी हे लोक एका जागी न राहता भटके जीवन कंठीत. छोट्या झोपड्यात राहून थोडीफार शेती करीत. डोके उघडे ठेवणे कोरकू जमातीत निषिद्ध मानतात. पुरूष कमरेला लंगोटी बांधून अंगावर उपरण्यासारखा कपडा पांघरतात. स्त्रिया लुगडे नेसतात पण पोलके घालत नाहीत. त्या गळ्यात पोवळ्याच्या, काचेच्या मण्यांच्या माळा घालतात आणि काशाच्या, चांदीच्या सऱ्या घालतात. तांब्यापितळेच्या अंगठ्या, जोडवी घालतात. कानात पितळेच्या बाळ्या घालतात. प्रत्येक दागिन्याला कोरकू भाषेत विशिष्ट नाव आहे. स्त्रियांना जंगली फुलांच्या माळा करून घालण्याची हौस असते.

कोरकू आदिवासींच्या जीवनात दिवाळी, आखाडी, होळी ,पोळा ह्यांच्यासारखे सण महत्वाचे मानले जातात. धार्मिक विधींचे नेतृत्व 'भूमका' नावाचा त्यांचा पुढारी करतो; त्यांच्या सर्व सणात मद्याचा फार मोठ्या प्रमाणावर वापर होतो. सामुदायिक नृत्यात आनंदाने सहभागी होणे ही त्यांच्या आनंदाची परमावधी असते. ह्या सणांच्या आसपास त्यांचे विवाह समारंभ होतात. विवाहाच्या काही प्रथा शतकानुशतके चालत आलेल्या आहेत. मुलाचे वडील, मुलीच्या वडिलांकडे मुलीसाठी मागणी करतात. मुलीच्या वडिलांना देज मिळतो. लग्नासाठी वधूच्या गावाला वरपक्ष जातो. वराच्या हातात लिंबू खोचलेला चाकू असतो. त्यामुळे भूतबाधा होत नाही असा समज आहे. वधूगृही बांबूचा मांडव घालतात. एका बांबूखाली पाटा आणि दिवा ठेवतात. पाट्यावर सात चिमट्या तांदूळ आणि सात चिमट्या हळद ठेवतात. त्या बांबूला सात फेऱ्या वधूवर मारतात. त्यावेळी वधू प्रत्येक फेरीच्या वेळी पायाने एक एक तांदूळ आणि हळद ह्या वस्तू लाथाडते. अशा

सात फेऱ्या झाल्यावर विवाह संपन्न होतो.

काही कोरकू तरूण आपल्या आवडीच्या तरूणीला पळवून नेऊन लग्न करतात. त्यांना भूमका दंड करून परत समाजात घेतो. काहींना देज देण्याची ऐपत नसते ते वधूपित्याकडे वर्षे दोन वर्षे काम करून वधूमूल्य चुकते केल्यावर विवाहबद्ध होतात.

मेळघाटाबाहेर मध्यप्रदेशात खांडवा, पंचमढी भागात कोरकुंची वस्ती आहे. पंचमढीच्या डोंगरात आदिवासींचे महादेव मंदिर आहे. तेथे जत्रेत देवाला कोंबडा , बकरा बळी देतात. हळूहळू बळी देण्याची प्रथा आता कमी होत चालली आहे.

कोरकू आपली उपजीविका वन्य प्राण्यांची शिकार थोडी फार शेती, फळे कंदमुळे, मध आणि दारू हयांच्यावर करतात. रोज व्यवस्थित आहार न मिळाल्याने कोरकू सदैव कुपोषणाच्या छायेत असतात. पूरक आहाराची संकल्पना त्यांच्यात नाही. त्यामुळे लहान मुलांना उपासमारीने मृत्यू येतो आणि प्रतिकार शक्ती कमी असल्याने बालमृत्यूचे प्रमाण खूपच वाढते. एक हजार जन्मामागे जवळजवळ शंभर बालके पहिल्या वर्षातच मृत्युमुखी पडतात. प्रचंड गरीबी, शिक्षणाचा अभाव, अज्ञान, अनेक प्रकारची रोगराई, क्षयरोग, न्युमोनिया, जंतांचे विकार , घातक अंधश्रद्धा यामुळे आरोग्याचे प्रश्न सोडविणे फार अवघड झाले आहे.

मेळघाट हा भाग दुर्गम असल्याने वीज, रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्रे , शाळा यांच्यासारख्या सुविधा तेथे पोहोचविणे कठीण आहे. आदिवासी संघटित नसल्याने त्यांचे म्हणणे कोणी ऐकून घेत नाहीत. वर्षातील काही दिवस त्यांना विडी पत्ता गोळा करण्याचे काम मिळते पण नंतर वर्षभर उत्पन्नाचे कोणतेही हमखास साधन त्यांना उपलब्ध नसते. त्यांना नियमित उत्पन्न देणारा रोजगार निर्माण करून दिला तर त्यांचे कुपोषणासारखे प्रश्न सुटू शकतील त्यांची क्रयशक्ती वाढली तर ते अन्न धान्य खरेदी करू शकतील आणि त्यांचे आयुष्यमान वाढू लागेल. सध्या आदिवासींचे सरासरी आयुर्मान चाळीस वर्षे आहे.

मेळघाटातील कुपोषणामुळे झालेल्या मृत्युंची बातमी दरवर्षी वर्तमानपत्रात गाजते. ह्या मृत्युंची चौकशी करण्यासाठी काही समित्या नेमल्या जातात. ,जुजबी उपाय केले जातात पण दूरदर्शी उपकारक योजना कधीच आखल्या जात नाहीत. काही स्वयंसेवी संस्था ह्या भागात चांगले काम करीत आहेत पण ते प्रयत्न पुरेसे नाहीत. शासकीय यंत्रणा काही ठिकाणी अस्तित्वात आहे पण दूरवरच्या भागात सोयी पुरविणे अनेक कारणांनी दुरापास्तच होऊन बसले आहे. दुर्गम भागातील अनेक अडचणींमुळे शासकीय कर्मचारी तिकडे राहून काम करण्यास तयार नसतात. चांगले काम होण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविणे आवश्यक आहे. शासन ह्या कामासाठी मुबलक निधी देते पण प्रत्यक्षात त्याचे सुपरिणाम कोठे दिसत नाही.

आदिवासींच्या कल्याणाचा प्रश्न फार महत्वाचा आहे. तो योग्य तऱ्हेने सोडविला न गेल्याने नक्षलवादी चळवळी सुरू होऊन परिस्थिती स्फोटक झाली आहे. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वीच ठोस उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

■ ■ ■

# आदिवासी स्त्री ,संस्कृती आणि शिक्षण

- प्रा.डी.एस. सूर्यवंशी

कोणत्याही समाजाच्या सुधारणेचा मूळ पाया शिक्षण हा आहे. मुख्यत: मागासलेल्या समाजात शिक्षण नसेल तर आर्थिक किंवा सामाजिक प्रगतीसाठी केलेले प्रयत्न फोल ठरतात. भारतातील काही समाजघटकांची प्रगती झाली असली तरी बहुजन समाज अद्यापही शिक्षणापासून वंचितच आहे. त्यातही दऱ्याखोऱ्यात जंगलात राहणाऱ्या आदिवासी जमाती तर जवळ जवळ निरक्षरच आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४२ (१) नुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेल्या जमातींना 'अनुसूचित जमाती 'असे संबोधले जाते.

इतर सर्व भारतीयांपेक्षा शैक्षणिक , आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या मागासलेला समाज म्हणजे अनुसूचित जमाती होय. त्यांची संख्या एकूण भारतीयांच्या सुमारे ९ टक्के आहे.

एखाद्या देशाची सर्वांगीण प्रगती किंवा विकास साधावयाचा असेल तर त्या देशातील नागरिक बलवान, सुदृढ व शिक्षित असणे अत्यंत आवश्यक आहे. ह्या दृष्टीकोनातून विचार केल्यास भारतातील निम्म्या पेक्षा अधिक जनता ग्रामीण व दुर्गम भागात रहाते. या भागात शिक्षणाचे प्रमाण अतिशय कमी आहे. विशेषकरून या भागातील महिलांच्या निरक्षरतेचे प्रमाण अतिशय जास्त आहे. निरक्षरता हा कलंक असून देशाच्या विकासाला खीळ आहे.

"स्त्री व पुरुष हे समाजाचे दोन पंख आहेत केवळ एका पंखाने पक्ष्याला उडता येत नाही, त्याचे दोन्ही पंख मजबूत असावे लागतात. समाजाचेही तसेच आहे ". हे स्वामी विवेकानंदाचे उद्गार लक्षात ठेवले पाहिजेत व आपल्या भारताच्या गणराज्यास विनम्र अभिवादन करून 'मातृहस्तेन भोजनं मातृमुखेन शिक्षणम् ' हा पूज्य विनोबाजींचा मंत्र साकार करण्याचा निर्धार केला पाहिजे.

स्वर्गीय इंदिरा गांधी यांनी म्हटले आहे की अशिक्षित महिला आपल्या आई-वडील , पती आणि मुलांवर असहाय्यपणे अवलंबून असते. तिला आपले आयुष्य ओझे वाटू लागते. शिक्षणामुळे तिला आत्मविश्वास प्राप्त होतो, तिच्या निवडीचे क्षेत्र रूंदावते. ती काम करू शकते, आपल्या व्यवसायात नाव कमावते आणि आपल्या आईवडिलांचा नावलौकिक वाढवू शकते.

२००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यातील स्त्रियांच्या साक्षरतेचे प्रमाण ४० टक्याने वाढले आहे. पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८६.२७% तर स्त्रियांचे ६७.५% इतके आहे. परंतु या साक्षर महिलांपैकी किती महिलांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग केला आहे? राष्ट्रीय कार्यात हातभार लावण्याची क्षमता किती स्त्रियांमध्ये आहे? १०० पैकी ५० स्त्रिया आहेत म्हणजेच यातील फक्त लिहिता वाचता येते अशा स्त्रियांचीच संख्या जास्त असण्याची शक्यता नाकारता येत नाही, शहरी भागातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण ग्रामीण भागातील स्त्री साक्षरतेपेक्षा जास्त आहे. महाराष्ट्रातील

स्त्री साक्षरता प्रमाणामध्ये मुंबई प्रथम क्रमांकावर आहे. येथील २००१ नुसार स्त्री साक्षरता ८७.१७% असून नंतर नागपूर, अमरावती, पुणे यांचा क्रमांक लागतो. धुळे , नंदुरबार, गडचिरोली ह्या जिल्ह्यांतील स्त्री साक्षरतेचे प्रमाण समाधानकारक नाही. हया जिल्ह्यांमध्ये आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. नंदुरबार जिल्हा हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे आदिवासी स्त्री साक्षरता सर्व साधारण स्त्री साक्षरता यात मोठी तफावत आहे त्याला खालील कारणे आहेत.

१. आदिवासी ज्या भागात राहतात त्या भागाचा विकसनशील भागाशी येणारा तुटपुंजा संबंध

२ आदिवासींची आर्थिक स्थिती

३ आदिवासी क्षेत्रात असलेल्या शिक्षणाचा अपुऱ्या सोयी

४ आदिवासी स्त्रीची शिक्षणा बद्दल असलेली अनास्था

अतिशय काटक, कष्टाळू , स्वयंसिद्ध , निर्भय आणि निडर अशी आदिवासी स्त्री जंगलातून, डोंगरकपारीतून पोटापाण्याच्या व्यवस्थेसाठी ऊन-पावसाची पर्वा न करता हिंडत असते. स्व कमाईवर उदरनिर्वाह करणे , प्रसंगी कुंटुंबाचीही जबाबदारी उचलणे ही जणू त्यांची परंपराच आहे. आजही मुख्यत्वे जंगलात, शेतीत काम करून त्या आपले जीवन जगत आहेत.

भल्या पहाटे शेतात जाऊन चारा आणून त्याचा विशिष्ट पद्धतीने भारा बांधला जातो. मोठाले भारे डोक्यावर घेऊन मैल न मैल पायी चालत ती गवत विकण्यासाठी जाते. तसेच पहाडातल्या आदिवासी स्त्रिया लाकडाच्या मोळ्या घेऊन १०-१२ मैल चालत शहराच्या ठिकाणी जातात व मोळ्या विकतात, आदिवासी पुरुषापेक्षाही आदिवासी स्त्री अधिक कष्टाची कामे करतांना दिसते. गर्भवती असतांनाही अगदी बाळंतपणापर्यंत ती कष्टाची कामे करत असते. बाळंतपणानंतरही आठ दिवसांनी लगेच चिमुकल्याला टोपलीत घालून जंगलात,शेतात जाते व पोटासाठी स्वत:ला कामाला जुंपून घेते.

अर्थात कमवती असुनही स्त्रीचे स्थान दुय्यमच असते. आर्थिक व्यवहार सगळा पुरूषाकडे असतो. मात्र आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य या आदिवासी मुलीला असते. तिच्या संमती शिवाय लग्न लावून दिले तर मुलगा तिला आवडल्यास ती त्याच्या बरोबर संसार करते अन्यथा दुसरा नवरा करण्याची तिला पूर्ण मुभा असते. आदिवासींमध्ये विधवा स्त्रीला अधिक स्वातंत्र्य असते. विधवा झाल्यावर नवऱ्याचे दडपण नसल्यामुळे अधिक मोकळेपणाने तिला इकडे-तिकडे जाता येते. घरातील सारी सूत्रे तिच्याकडे असतात. डोक्यावर पदर घेणे ,घुंघट घेणे ही प्रथा आदिवासी समाजात असली तरी त्याचे कडक नियम नाहीत. आजकाल आदिवासी मुली शिक्षण घेऊ लागल्या आहेत. त्यामुळे ही प्रथा हळूहळू कमी होत चालली आहे. आदिवासींमधील सणवाराच्या वेळी गीतगायन, साजशृगांर नृत्य,गायन, मद्यपान या सर्व प्रकारात आदिवासी स्त्री आघाडीवर असते. परंतु धार्मिक व्यवहारात तिला फारसे स्थान दिले जात नाही असे दिसते.

जादूटोणा ,भूतखेत यांच्यावर विश्वास ठेवणारा असा हा समाज आहे. आजारपणात जडीबुटीचा ,मंत्रतंत्राचा उपयोग केला जातो. भगत उतारा देतो,रक्षा देतो, मातीची बाहुली बनवून भुतांच्या नावाने पूजा केली जाते. भूत पळविण्यासाठी देवाच्या नावाने मंत्र म्हणून देवाची मदत घेतली जाते. कोबडं मारल जातं, भुताला व देवाला दारूचा नैवैद्य दाखविला जातो. एवढे करूनही आजारी बरा झाला नाही तर त्याला कोणीतरी चेटकीण, डाकिण असलेली बाई त्रास देत असावी असा अंदाज वर्तविला जातो. मग भगत

गावातल्या एखाद्या बाईचे नाव सांगतो किंवा गावकरी तिला शोधून काढतात. डाकिण असल्याची चिन्हे म्हणजे एकटी बाई देवळात पुजेला गेली, देवळात नारळ फोडले, तिचे मूल जन्माल्याबरोबर मृत्युमुखी पडले इ. डाकिण कोण? या प्रश्नाचे उत्तर शोधून काढण्यासाठी आणखी एक पद्धत रूढ आहे. त्या गावातल्या (वाड्यातल्या) सर्व बायकांना, चांभाराकडे न्यावयाचे व चांभाराने गुरांचे कातडे एका कुंड्यात भिजवून ठेवलेले असते ते चांभार कुंड्यातले पाणी प्रत्येकाला पिण्यास भाग पाडावयाचे जी बाई पाणी पिण्यास नकार देते किंवा जिला ते पाणी पिऊन उलटी होते ती डाकिण असे समजले जाते.

आदिवासींच्या लग्नात मुलाकडून मुलीला हुंडा देण्याची पद्धत असली तरी लग्नकार्यात मुलाला महत्वाचे स्थान असते. लग्नानंतर नवरा पुढे व बायको मागे असावी अशीच भावना असते. बाजारात वगैरे गेल्यावर पिशव्या बायकोने उचलाव्यात व नवऱ्याने रिकाम्या हाताने पुढे चालावे नवीन लग्न झाल्यावर दोघेही जोडीने माहेरी गेले व गावात शिरल्यानंतर जर मुलगी नवऱ्याच्या पुढे असेल तर तिच्या मैत्रिणी सुद्धा तिला चिडवतात.

एकंदरीत आदिवासींची व आदिवासी स्त्रीची ही स्थिती आपल्या दृष्टीने अतिशय दयनीय आहे. कामाच्या ओझ्याखाली ती वाकलेली आहे. द्रारिद्रयरेषेच्या फारच खाली त्यांचे राहणीमान आहे. आधुनिक विद्युत उपकरणाशी त्यांचा संपर्क जवळ जवळ नाहीच.

इतरांच्या दृष्टीने आदिवासी स्त्रीची ही अवस्था किती ही चिंता करण्यासारखी असली तरी प्रत्यक्ष आदिवासी स्त्री ही इतर समाजातील स्त्रीपेक्षा अधिक समाधानी व आनंदी आहे. आपली रानावनातील कामे करीत असतांना स्वच्छंदपणे ती गाणे गुणगुणत वावरते. तिच्या या दयनीय अवस्थेची तिला जाणीवही नाही. तिच्या व्यवसायात तिला कष्टाळू, कामसू प्रामाणिक आहे. तशी ती आर्थिकदृष्टया स्वावलंबी आहे म्हणून आदिवासी समाजात इतर समाजापेक्षा स्त्री पुरूष समानता अधिक आहे.

वर वर्णन केलेले गुण स्त्रीमध्ये आहेत, ती शरीराने काटक, मनाने निर्भय, कष्टाचे कामही आनंदाने करणारी आणि निसर्गाशी अतिशय जवळीक असलेली ही स्त्री जर शिक्षित झाली तर तिला आधुनिक जगाचे ज्ञान झाले, आधुनिक विज्ञान तिने जाणून घेतले तर ही स्त्री समाजाला पर्यायाने राष्ट्राला फारच उपकारक ठरणार आहे. या स्त्रियांमधून पुढे कदाचित भारताच्या भाग्यविधाता निर्माण होतील.

आदिवासी मुलांना शिक्षण घेतांना अनेक अडथळे होत असतात आणि त्यामुळे काही वेळा शिक्षण घेणे कठीण होते. शासनाने आदिवासी मुलामुलींच्या शिक्षणाकरिता अनेक सवलती दिल्या आहेत परंतु ह्या सवलतीमुळे त्यांच्या काहीच अडचणी सुटू शकतात.

आदिवासी मुलामुलींची सर्वात महत्वाची अडचण म्हणजे भाषेचा प्रश्न. आदिवासी मुलांना प्राथमिक शिक्षण घेत असतांना आदिवासी भाषेव्यतिरिक्त इतर कोणतीही भाषा चांगल्या रितीने बोलता व लिहिता येत नसल्याने शिक्षकांना शिकवितांना अडथळा निर्माण होतो. त्यामुळे त्यांचे नुकसान होते म्हणून काही मुली अभ्यासात मागे पडतात. अनेक अपभ्रंश शब्द त्यांच्या बोली भाषेत आढळतात. शाळेत मराठी माध्यम असते. सर्वांना मराठी समजते असे गृहित धरून शिक्षणक्रम आखलेला असतो. आदिवासी मुलामुलींना शिक्षक काय म्हणतात हे लवकर कळत नाही आणि सर्व वेळ शाळेत नुसते बसून राहणे त्यांना जमत नाही.

मुलींना त्यांच्या घरातील वातावरणामुळे शिक्षण घेता येत नाही. म्हणजे आई-वडील हे अशिक्षित असल्याने मुलींना जास्त शिकवायचे नाही. कितीही शिकवले तरी मुली ह्या परक्या घरच्या असतात असे त्यांचे मत असते. काही मुली हया आर्थिक अडचणींना बळी पडतात इतर काही मुली ह्या कौटुंबिक समस्यांना बळी पडतात . आई-वडील मजुरी करण्यास गेल्यावर घर सांभाळणे, लहान भावडांना सांभाळणे अशा प्रकारच्या कोणत्याही अडचणी असतात. परंतु त्यांना आदिवासी मुलांशिवाय इतर समाजाच्या मुलींमध्ये एकत्रितपणे समायोजन करता येत नाही.

शाळेत शिकणाऱ्या आदिवासी मुलींमध्ये गळतीचे व स्थगनाची अनेक कारणे आढळून येतात. गळतीच्या कारणांमध्ये पालकांच्या आर्थिक दौर्बल्यामुळे मदतीसाठी म्हणून मुलींना शेतात काम करावयास जावे लागते. तसेच ह्याच कारणामुळे आवश्यक ते शैक्षणिक साहित्यही (उदा.वह्या, पुस्तके, पेन, कंपास इ.) घेऊ शकत नाही, मुलींना आपल्या शाळेची वेळ गैरसोयीची वाटते. मुलींच्या शिक्षणाबाबत पालकांमध्ये उदासीनता असते. आदिवासी समाजात बालविवाहप्रथा आढळते. यामुळे ही गळती होते . शिक्षकाचे अध्यापन समजत नसल्याने अभ्यास कच्चा राहतो व परिक्षेत नापास व्हावे लागते. आणि शाळेत उशिरा प्रवेश दिल्याने देखील गळतीचे प्रमाण वाढते.

याच प्रमाणे आदिवासी मुलींचे स्थगितीची कारणे आहेत यात महत्वाचे म्हणजे आर्थिक मदतीसाठी घरकाम , भावडांना सांभाळणे ,वनउपज गोळा करणे, मजुरी करणे ह्या सारखी कामे करत असल्याने शाळेतील मुलींची उपस्थिती अनियमित असते. शिक्षक आदिवासी मुलींकडे दुर्लक्ष करतात, योग्य वेळी मार्गदर्शन दिले जात नाही त्याचप्रमाणे मातृभाषा व शाळेतील शिक्षणाचे माध्यम वेगळे असल्याने अभ्यास कच्चा रहातो. तसेच प्रतिकुल वातावरण व अपुऱ्या आहाराचा मुलींच्या शारीरिक व मानसिक क्षमतेवर परिणाम होतो. याचाही परिणाम उपस्थितीवर होतो. कौटुंबिक वातावरण अशैक्षणिक असल्याने स्थगिती प्रमाण वाढते आणि शाळेत अयोग्य वेळी. अयोग्य वयात दाखल केल्यानेही मुलींचे स्थगनाचे प्रमाण वाढते.

प्राथमिक शिक्षणापेक्षा माध्यमिक शिक्षण घेत असतांना मुलांपेक्षा मुलींमध्ये स्थगन व गळतीचे प्रमाण अधिक आढळून येते.

आज शासनाने खेडोपाडी शाळा उघडल्या आहेत. यात प्रामुख्याने आश्रमशाळा, अंगणवाडी, निवासी आश्रमशाळा इ. परंतु २१व्या शतकात सुद्धा आदिवासी स्त्री निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. निरक्षर स्त्रिया शेकडा ७२ आहेत. पुरूषांच्या साक्षरतेचे प्रमाण शेकडा ४५ आहे. आदिवासी भागात व कमी लोकवस्तीच्या भागातून शेकडा ९०स्त्रिया निरक्षर आहेत. प्राथमिक शिक्षणात स्त्रियांचे प्रमाण शेकडा १८ ते २० इतकेच आहे तेही नवीन पिढीत (१९ ते २० वयोगटात) शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे दिसते. माध्यमिक शिक्षणात स्त्रियांचे प्रमाण शेकडा ४ ते ५ आहे. तर उच्च शिक्षणात ते अल्पच म्हणजे शेकडा १ ते २ इतकेच आहे. ते शहरी वस्तीत किंवा शहरी वस्तीजवळ गावातच आहे.

अशिक्षित स्त्रियांत अद्यापही मुलींच्या शिक्षणाबाबत अनास्था आढळते. स्त्रीचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल हेच असल्याचे त्यांना वाटते. ज्या कुंटुंबात सुशिक्षित पालक असतात त्या कुंटुंबातील मुले व मुलीही शाळेत जातात. शिक्षित स्त्रिया आपली बाजू मांडण्याचा प्रयत्न करतात.

नोकरीमध्ये आदिवासी स्त्रियांचे प्रमाण कमी आहे याला कारण म्हणजे पुरेशी शैक्षणिक अर्हता असलेल्या आदिवासी स्त्रियांची संख्या कमी आहे.

थोडक्यात असे सांगता येईल की, आदिवासींसाठी अनेक प्रकारच्या सवलती केंद्र व राज्य सरकारने दिलेल्या असल्या तरी त्यांचा तितका फायदा आदिवासी घटकांपर्यंत पोहोचत नाही. त्यासाठी या फायद्याची, सवलतींची आणि आर्थिक सहाय्याची माहिती हया समाजातील सर्व लोकांपर्यंत जाईल अशी काळजी घेतली पाहिजे. आदिवासी बालकांसाठी केवळ आश्रमशाळा उघडून भागणार नाही. कारण आदिवासी कुटुंबातील प्रत्येक बालक आपआपल्या परीने अर्थार्जन करीत असतो आणि कौटुंबिक अंदाजपत्रकाला हातभार लावत असतो याचा विचार व्हावयास हवा. तसेच सावित्रीबाई फुले दत्तक योजनेसारखी एखादी विशेष योजना खास आदिवासी मुलींसाठी राबवता येईल का?याचा विचार झाला पाहिजे. शैक्षणिक सोयी निवासस्थानाच्या जवळपास उपलब्ध नसल्यानेही शिक्षणावर परिणाम झाला आहे. त्या दृष्टीने प्राथमिक शिक्षणासाठी कोणत्याही बालकाला एक- दोन किलोमीटरपेक्षा जास्त चालावे लागू नये आणि माध्यमिक शिक्षण त्याच्या निवासस्थानापासून ३-४ किलोमीटरच्या परिसरात उपलब्ध होईल. या दृष्टीने शैक्षणिक संस्था निर्माण झाल्या पाहिजेत.

तसेच आदिवासी स्त्रियांना विविध स्तरावर नोकरी मिळण्याची शक्यता शासनाच्या आरक्षण विषयक योजनेमुळे वाढली आहे. नोकरीत नव्याने प्रवेश घेणाऱ्या या महिलांसाठी त्यांचा आत्मविश्वास वाढावा. म्हणून सेवांतर्गत प्रशिक्षणाची विशेष सोय झाली पाहिजे.

वरील सर्व बाबींची पूर्तता झाली तर नक्कीच आदिवासी स्त्री व इतर समाजातील स्त्री यांमध्ये भेद आढळणार नाही.

■ ■ ■

# प्रवाशासाठी

*- लिंडा होगान (१९४७)*

झोपेत आपण ऐकतो महासागर गाज
पृथ्वीच्या आत करत प्रवास
स्वत:ला फेसळत्या धारेगत सांडत
पाण्याच्या वाचेने
जी गात गात उघडते
पृथ्वीचे महाद्वार
त्यांनी केल्या सफरी
आपल्या प्रियजनांच्या कबरीवरून
परिक्रमा करतांना
कबरींची कथा हवेत सांडतांना
आपल्या वर्तुळासह वृक्षांनी सोडलीय दृष्टी
अपराधांवर
जे वाढतात आपल्यात आणि आपल्या विरूद्ध
आपल्याला सर्व आहे आठवण
अद्यापही तिच्या अंग नी हाडामासांनी
खिळवून ठेवलं आहे.
आमच्या जवळ आहेत काय
तेवढ्याच प्राचीन जेवढ्या की
हे महासागर त्यांचा गाज
कोलाहलाच्या जीभा जे
कधी काळी झाले होते शांत
हे सर्व महासागर
जे धारण केलेय आपण
हळू हळू येतायेत प्रकाशात

(मराठी अनुवाद -भुजंग मेश्राम)

# पंचायत राज्य संस्थेत आदिवासी महिलांचा सहभाग

- डॉ. श्रीराम महाकरकार

गडचिरोली जिल्हयातील अहेरी, एटापल्ली व भामरागड पंचायत समित्यांच्या क्षेत्रात आदिवासी महिलांचा सहभाग फार अल्प प्रमाणात दिसून येतो. एका ग्रामपंचयातीला भेट दिली असता तेथील महिला सरपंच वासंतीबाई निरक्षर होती. तिला हलबी शिवाय कोणतीही भाषा येत नव्हती. ग्रामपंचायतीचे कामकाज मराठीत चालत होते. परंतु तेथील पुरूष महिला सदस्या माडिया भाषेत चर्चा करत होते. परंतु त्यांची भाषा ग्रामसेवकाला समजत नव्हती. या ठिकाणी अशी त्रिशंकू परिस्थिती आढळून आली. कागदोपत्री कामकाज सरपंचाच्या नावे होत असले तरी प्रत्यक्ष सत्ता मात्र ग्रामसेवकाच्या हातात होती. सरपंचाचा शिक्का ग्रामसेवकाच्या घरीच असतो कारण त्या निरक्षर सरपंच महिलेला काय कळणार. आदिवासींसाठी शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजनांचा गंधही त्या सरपंच वासंतीबाईला असणार नाही. या महिलांना सत्ता मिळाली पद मिळाले परंतु त्या पदाच्या अधिकाराची जाणीव त्यांना झाली नाही.

एका ठिकाणी तर फार मजेदार परिस्थिती दिसून आली. तीन वर्षे एक महिला ग्रामपंचायत सदस्य होती . परंतु तिला ग्रामपंचायत कोठे आहे हे माहित नाही. ग्रामसेवक घरी येतो. सभा झाल्याच्या सह्या घेऊन जातो. ग्रामपंचायतीमध्ये जी महिला जात नाही तिला ग्रामपंचायत माहित नाही तर ती पंचायत राज्य संस्थेत काय सहभागी होणार, योजनांची माहिती लोकांपर्यत केव्हा पोचविणार व त्यांची अंमलबजावणी केव्हा होणार ? असे अनेक प्रश्न आपल्यासमोर उभे रहातात.

आजही अहेरी, एटापल्ली व भामरागड पंचायत समित्यांमध्ये अतिदुर्गम आदिवासी क्षेत्रात ग्रामपंचायतीच्या सभा कित्येक महिने होत नाहीत. फक्त कागदोपत्री दाखविण्यात येतात. सदस्यांच्या सह्या घरी जावून घेतल्या जातात असे चित्र आपल्याला प्रत्यक्ष पहायला मिळते. या क्षेत्रात एकूण २४८ महिला सदस्या असून ६४.९१ टक्के सदस्या ह्या माडियागोंड आदिवासी जमातीच्या आहेत. १०.८८ टक्के इतर आदिवासी असून २४.१९ टक्के बिगर आदिवासी महिला सदस्या आहेत.

ह्या स्त्रियांचा पंचायत राज्य संस्थेत सहभाग वाढविण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. या आदिवासी क्षेत्रात ७५.५३टक्के सदस्या निरक्षर आहे. २४.४६ टक्के सदस्या शिकलेल्या आहे.

आजही ३८.४२ टक्के स्त्रियांना मराठीचे ज्ञान नाही. ५४.२६ टक्के स्त्रियांना जिल्हयाचे नाव माहित नाही ८०-८२ टक्के स्त्रियांना देशाचे नाव माहित नाही. अशी परिस्थिती पहायला मिळते.

कित्येक ठिकाणी ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक साहेब ठरला. कारण काही आदिवासी स्त्रिया निरक्षरतेमुळे व अज्ञानामुळे ग्रामपंचायतीचे काम पाहू शकत नाही.

काही ठिकाणी माडिया स्त्री सरपंच आहे. तिला माडियाशिवाय दुसरी भाषा येत नाही. भाषेचे (मराठी) ज्ञान नाही. ग्रामसेवकाला माडिया भाषा येत नाही. कार्यालयीन कामकाज मराठीत चालते. अशी स्थिती असली तर विचाराचे आदानप्रदान होणार नाही. सरपंच स्त्री व ग्रामसेवक यांचे बरोबर जुळणार नाही. अशावेळी नामधारी शासक सरपंच असतो आणि ग्रामसेवक वास्तविक शासक बनतो.

आदिवासी समाजाच्या रूढी परंपरेतील निवाडा प्रक्रियेत महिलांचा सहभाग नगण्य आहे. त्याचप्रमाणे ३३ टक्के महिला आरक्षणाच्या काळात ग्रामसभेत महिलांच्या उपस्थितीचे , सहभागाचे प्रमाण कमीच आहे. आदिवासींच्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के महिला आहे. यापैकी जर महिलांची ग्रामसभेत उपस्थिती नगण्य असेल तर महिलांविषयी निर्णयाला निर्णय म्हणावा काय? वेगळ्या ठिकाणी महिलांनी एकत्र येऊन त्यांनी त्यांच्या बहुमताने एखादा निर्णय घेतला तर तो ग्रामसभेवर बंधनकारक राहील काय? हे प्रश्न आपल्यासमोर येतात.

आजही ग्रामसभांचे निरीक्षण केले असता या सभांमध्ये सुरूवातीला काही स्त्रियांची उपस्थिती दिसून येत असली तरी ह्या स्त्रिया शेवटपर्यत सभेत उपस्थित रहात नाहीत. सभेत बोलत नाहीत, कोणत्याही प्रकारचे ठराव मांडत नाहीत. यावरून या ग्रामसभांमध्ये स्त्रियांचा सहभाग अल्प आहे, हे दिसून येते.

या अतिदुर्गम आदिवासी भागातील स्त्रियांचा शैक्षणिक दर्जा खालावलेला असून जाणीव जागृती कमी प्रमाणात आहे. त्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न कमी असून उत्पन्नाची साधने मर्यादित आहेत. त्यांच्यावर परंपरागत संस्कृतिचा पगडा असून राजकीय सहभागाची इच्छा कमी प्रमाणात आहे. राजकीय सहभागासाठी भाषेची समस्या निर्माण झाली आहे. इत्यादी कारणांमुळे अतिदुर्गम भागात स्त्रियांचा सहभाग कमी प्रमाणात दिसून येतो.

७३ व्या घटना दुरूस्तीने स्त्रियांना ३३ टक्के आरक्षण प्राप्त झाले. सबलीकरणाची प्रकिया सुरू झाली. पंचायत राज्य संस्थामध्ये सदस्या, सरपंच, सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष या पदावर आरुढ झाल्यात , परंतु या पदांच्या अधिकारांची जाणीव त्यांना आहे काय? याचा विचार करणे आवश्यक आहे. या स्त्रियांना राजकीय संस्था व प्रक्रियेची पुरेशी माहिती नसल्यामुळे त्यांना काही पुरूषी वर्चस्वाशी तर कधी प्रशासकीय यंत्रणेशी झगडावे लागते. म्हणून त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यांची जाणीव जागृती करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेल्या पदाचे अधिकार व कर्तव्य पटवून देऊन शासकीय योजनांची पुरेशी माहिती त्यांना समजावून सांगितली तर स्त्रियांचा पंचायत राज्य संस्थेत सहभाग वाढू शकतो.

■ ■ ■

# लोकशाहीमधील प्रभावी अस्त्र - माहितीचा अधिकार

**- ग.शां.पंडित**

अन्न ,वस्त्र निवारा या आपल्या मूलभूत गरजांइतकीच माहिती सुद्धा एक गरज आहे. आपण आपले जीवन माहितीच्या आधारानेच जगत असतो. म्हणूनच माहिती ही ज्ञानाची जननी आहे असे म्हणतात. माहितीशिवाय अडत नाही, असे कोणतेच क्षेत्र नाही.

आपल्या राज्यघटनेत देखील कलम १९(१) व २१ नुसार प्रत्येक भारतीय नागरिकाला विचार व व्यक्तिस्वातंत्र्याचे अधिकार दिले आहेत; ज्यात माहितीचा अधिकार अंतर्भूत आहे. परंतु आपण कोणत्याही शासकीय कार्यालयात काही माहिती घेण्यासाठी गेलो तर , ती देण्यास टाळाटाळ केली जाते, कारण देशात अजूनही भारतीय कार्यालयीन गोपनीयता कायद्याची अंमलबजावणी केली जाते. हा देश सोडून जाताना ब्रिटिशांनी गोपनीयतेचा कायदा आपल्या हवाली केला आणि त्याचा गैरफायदा इथल्या राज्यकर्त्यांनी व अधिकाऱ्यांनी सामान्य लोकांची अडवणूक करण्यासाठी करून घेतला.

ज्येष्ठ समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांना ते ग्राम विकासाचे काम करत असताना आलेल्या अनुभवांतून त्यांच्यालक्षात आले की माहिती अभावी प्रत्येकाचे अडत असते. त्यासाठी त्यांनी शासनाच्या कामात पारदर्शकता यावी व शासकीय कामांची माहिती जनसेत सहजरित्या उपलब्ध व्हावी यासाठी शासनाने माहितीच्या अधिकारांचा कायदा करावा अशी मागणी राज्य व केंद्रसरकारकडे केली. त्याचबरोबर १९२३ चा गोपनीयतेचा कायदा रद्द करावा असेही सुचविले.

महाराष्ट्रात सेना-भाजपा युतीच्या काळात अण्णांच्या या मागणीकडे फारसे कोणी लक्ष दिले नाही. नंतर आलेल्या आघाडी सरकारने मात्र तातडीने अण्णांच्या मागणीचा विचार केला आणि महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००० या नावाने कायदा पास केला. परंतु या कायद्याच्या मसुद्यात अनेक त्रुटी होत्या. लोकांच्या दृष्टीने तो निरूपयोगी होता. त्यामुळे या कायद्यातील त्रुटी दूर करून शासनाने सुधारीत कायदा लागू करावा अशी मागणी राज्यशासनाकडे करण्यात आली.

त्यावेळेच्या मुख्यमंत्र्यांनी त्रुटी दूर केल्या जातील असे आश्वासन दिले, परंतु त्याच्यावर कार्यवाही मात्र झाली नाही. काही काळानंतर मुख्यमंत्र्यांनी अण्णांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञांची एक मसुदा समिती नेमली. या समितीने ३-४ महिन्यांमध्ये सुधारित कायद्याचा मसुदा तयार करून दिला पण शासनाने तो विषय प्रलंबित केला.

अखेरीस २३ सप्टेंबर २००२ रोजी खास अध्यादेश काढून मुख्यमंत्र्यांनी त्यावर राज्यपालांची सही घेतली व माहितीचा अधिकार अध्यादेश २००२ जाहीर करण्यात आला. परंतु शासनाचे अडवणुकीचे धोरण येथेच थांबले नाही. या अध्यादेशाचे कायद्यात रूपांतर होण्यासाठी त्या अधिवेशनात हा विषय घेतला गेला नाही.

त्याबाबत विचारणा केली असता सांगण्यात आले की, अध्यादेश केंद्राकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे.

पुन्हा एकदा सरकारमध्ये बदल झाला, आश्वासन देण्यात आले ; अंमलबजावणी मात्र झाली नाही. शेवटी एकदाचे राज्यशासनाने भारताचे राष्ट्रपती मा.डॉ ए.पी.जे .अब्दुल कलाम यांच्या सहीने १० ऑगस्ट २००३ रोजी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००३ मंजूर करून घेतला.

## माहितीचा अधिकार कायद्याची वैशिष्ट्ये

(१) या कायद्याची कार्यकक्षा वाढविण्यात आली असून या कायद्याने राज्य शासनाचा प्रत्येक प्रशासकीय विभाग, शासकीय व इतर प्राधिकरणे, सहकारी संस्था, सोसायटी नोंदणी कार्यालये, कामगार आयुक्त कार्यालये इत्यादि कार्यालये या कायद्याच्या कक्षेत आणली आहेत.

(२) लोकांना ही असलेली माहिती ठराविक वेळेत मिळावी यासाठी प्रत्येक शासकीय कार्यालयात शासकीय माहिती अधिकारी नेमण्यात येणार आहेत. प्रशासकीय प्रामुख्याने त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या कार्यालयात माहिती अधिकारी म्हणून एक किंवा अधिक अधिकाऱ्यांना नेमल्यानंतर सर्व माहिती अधिकाऱ्यांची नावे, पदे व पत्ते असलेली यादी जनतेच्या माहितीसाठी उपलब्ध करून द्यावयाची आहे. त्यामुळे लोकांना कोणाकडे संपर्क साधावयाचा हे कळणे सोयीचे होईल.

(३) अपेक्षित असलेली माहिती मिळविण्यासाठी इच्छुक असलेल्या व्यक्तीने ठराविक नमुन्यात दिलेल्या (जोडपत्र अ) अर्जावर १० रूपयांचा कोर्ट फी स्टँप लावून आवश्यक तपशीलासह अर्ज सबंधित खात्याच्या शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे करावयाचा आहे. शासकीय माहिती अधिकाऱ्याने तो अर्ज मिळाल्याच्या तारखेपासून १५ कामाच्या दिवसांत संबंधित माहिती अर्जदारास द्यायची आहे.

(४) शासकीय माहिती अधिकाऱ्याने माहिती देण्यास नकार दिला किंवा विनंती फेटाळली तर अर्ज करणाऱ्या व्यक्तीस ठराविक नमुन्यात दिलेल्या (जोडपत्र क) अर्जावर २० रूपयांचा कोर्ट फी स्टँप लावून संबंधित विभागाच्या अपिल प्राधिकाऱ्याकडे ३० दिवसांच्या आत अपील करता येईल.

अपिल प्राधिकाऱ्याकडूनही माहितीची विनंती करणाऱ्या व्यक्तीचे समाधान झाले नाही तर त्या व्यक्तीस अपिल प्राधिकाऱ्याच्या आदेशाच्या प्रतीसह लोक आयुक्तांकडे दुसरे अपिल (जोडपत्र ड) करता येईल. मात्र लोक आयुक्तांचा अपिलावरील निर्णय अंतिम असेल.

(५) एखाद्या व्यक्तीने मागितलेली माहिती देण्यास शासकीय माहिती अधिकाऱ्याने विलंब केला तर विलंब केल्याच्या प्रत्येक दिवसाकरिता २५० रूपये दंडाची तरतूद या कायद्यात आहे. जर संबंधित अधिकाऱ्याने जाणून-बुजून सदोष किंवा अपूर्ण माहिती दिली असल्याचे अपिलांमध्ये आढळून आल्यास २००० रूपये दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे.

मात्र मागितलेली माहिती आधीच राजपत्रात किंवा अन्यत्र प्रसिद्ध झालेली असेल व ती जनतेला उपलब्ध असेल अथवा ती माहिती मिळवण्यासाठी शासकीय साधन सामुग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागत असेल तर अशी माहिती देण्यास अधिकारी नकार देऊ शकतात.

(६) देशाचे सार्वभौमत्व, एकात्मता , सुरक्षितता, विदेशी संबंध यांना धोका पोहोचविणारी, न्यायालयाच्या अवमान करणारी, एखाद्या व्यक्तीचे जीवन धोक्यात

*( पान क्र. ३६ पहा )*

# शासनाने ग्रामसभेला दिलेले जादा अधिकार

- ग.शां.पंडित

महात्मा गांधी म्हणत की, खरा भारत खेड्यांमध्ये आहे. म्हणून खेडी स्वंयपूर्ण व स्वावलंबी बनली पाहिजेत. ग्रामस्वराज्य म्हणजेच संपूर्ण लोकसत्ताक राज्य . गावाचा कारभार गावाच्या हाती म्हणजेच गांधीजींनी सांगितलेली ग्रामस्वराज्याची संकल्पना होय. खरे तर गावाचा कारभार गावाच्या हाती म्हणजे केवळ ग्रामपंचायतीच्या हाती नसून त्या ग्रामपंचायतीवर देखरेख व नियंत्रण ठेवणाऱ्या ग्राभसभेच्या हाती आहे. गावातील सर्व मतदार ग्रामपंचायत निवडतात व या सर्व मतदारांची मिळून ग्रामसभा बनते,

१९९२ साली ७३ वी घटनादुरूस्ती झाली आणि ग्रामसभेची कायद्यात कायमस्वरूपी तरतूद करण्यात आली. त्यामुळे ग्रामपंचयातीने ग्रामसभा घेण्याचे सरपंच /उपसरपंचाने टाळल्यास त्यांचे पद जाऊ शकते व पुन्हा त्यांना त्या ग्रामपंचायातीच्या मुदतीत उभे राहता येत नाही, अशी तरतूद या कायद्यात करण्यात आली आहे. एवढे महत्व ग्रामसभेला देण्यात आले असूनही अद्याप लोक ग्रामसभेबद्दल उदासीन असल्याचेच चित्र दिसते. अजूनही सुमारे ८०-९० टक्के जनतेला ग्रामसभा म्हणजे काय याची नीटशी माहिती नाही. त्यामुळे लोकही केवळ वैयक्तिक कामाशिवाय इतर कुठल्या बाबतीत ग्रामपंचायतीच्या कामकाजात सहभाग घेत नाहीत. गावातील महिला व पुरूषांना सरपंच, सदस्य व ग्रामसेवक माहीत असतात. परंतु त्यांच्या जबाबदाऱ्या व ग्रामपंचायतीच्या कामकाजाची काहीच माहिती नसते.

इतकी टोकाची परिस्थिती का उद्भवावी? लोक ग्रामसभेबद्दल एवढे उदासीन व निष्क्रीय का व्हावेत, याचीही काही कारणे आहेत.

ग्रामसभेच्या सभा मोठ्या प्रमाणावर गणपूर्ती (कोरम) अभावी तहकूब होतात. तहकूब सभेस पुन्हा गणपूर्तीची आवश्यकता नसते. याचा गैरफायदा घेऊन सरपंच/उपसरपंच काही मोजक्याच व संबंधित लोकांच्या उपस्थितीत निर्णय घेतात.

पाणी, जंगल व जमिनीचा संबंध गावाशी असला तरी त्या विषयावर निर्णय घेण्याचा अधिकार ग्रामसभेला नाही.

ग्रामसभेच्या विषयांची सूची ही ग्रामस्थांच्या हिताची असतेच असे नाही. शिवाय स्थानिक प्रश्न, सामूहिक समस्या, वैयक्तिक प्रश्न याची चर्चा होण्यासाठी वेळही कमी मिळतो. त्यामुळे लोक ग्राभसभेला जाण्यास उत्सुक नसतात.

काही ग्रामस्थ स्थानिक प्रश्नांवर बोलू इच्छित असले तरी सरपंच व ग्रामसेवक त्यांना डावलातात.

दारिद्रयरेषेची यादी ग्रामसभेत केली जात नाही. गावचे पुढारी परस्पर निर्णय घेतात. त्यामुळे विकास योजनांचा लाभ अशा लाभार्थीना मिळत नाही.

ग्रामसभेत स्त्रिया,दुर्बल घटक उपस्थित रहात नाहीत. त्यांना जाणून-बुजून दूर ठेवले र ते. त्यामुळे

विकास योजना राबविण्याबाबत योग्य त्या सूचना मिळत नाहीत.

ग्राभसभेचा प्रचार, प्रसार व माहिती ग्रामस्थांना योग्य प्रकारे दिली जात नाही. तसेच ग्रामस्थांच्या वेळेनुसार ग्रामसभा घेतल्या जात नाहीत.

ग्रामसभेचे इतिवृत्त (प्रोसेडिंग) ग्रामसेवकाने ग्रामसभेतच लिहावयाचे असते ; परंतु प्रत्यक्षात कच्च्या नोंदी घेतल्या जातात व नंतर आपल्या सोयीप्रमाणे व सरपंच/उपसरपंचाच्या सांगण्याप्रमाणे त्या नोंदी पक्क्या केल्या जातात.

अनेक ठिकाणी ग्रामसभा घेतल्याची नोंद करून गावकऱ्यांच्या सह्या/अंगठे घेण्याचे प्रकारही घडतात.

लोकांच्या गरजेनुसार व त्यांच्या जीवनाशी निगडित कायदे राज्यपातळीवर केले जातात. परंतु कायद्याबाबतच्या सूचना ग्रामसभेत घेतल्या जात नाहीत. थोडक्यात ग्रामसभेला कायदेविषयक अधिकार नाहीत या व अशा इतर कारणांमुळे ग्रामसभा ही ग्रामपंचायतीच्या हातातले बाहुले बनली असून ग्रामस्थ तिच्याबाबत तटस्थ व निष्क्रीय बनत चालले आहेत.

ही परिस्थिती बदलण्यासाठीच ७३ व्या घटनादुरूस्तीनंतर महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती दुरूस्ती विधेयक १९९४ या नावाचा कायदा २२ एप्रिल १९९४ रोजी केला व त्यात ग्रामसभेबाबत काही तरतुदी करण्यात आल्या. परंतु केंद्राचा मूळ कायदा व महाराष्ट्र शासनाने केलेले दुरूस्ती विधेयक यात ग्रामसभेबाबत काही मूलभूत तफावत राहिलीच. त्यामुळे महाराष्ट्राच्या मूळ कायद्यातच बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली.

ज्येष्ठ समाजसेवक मा. अण्णा हजारे यांनी ग्रामसभांच्या काही तरतुदीमध्ये बदल करून ग्रामसभांना ग्रामपंचायतीवर नियंत्रण ठेवता येईल व गावाच्या विकासाचे निर्णय ग्रामसभेला घेता येतील अशी कायद्यात तरतूद करावी असे महाराष्ट्र शासनाला सुचविले . पंचायत राज संबंधी कार्य करणाऱ्या अन्य काही व्यक्ती व संस्थांनी सुद्धा शासनाला ग्रामसभांच्या सुधारणासंदर्भात काही शिफारशी केल्या.

महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेचे महत्व लक्षात घेतले व पंचायतराज कायद्यात ग्रामसभेच्या बाबतीत योग्य ती दुरूस्ती केली. १५ एप्रिल १९९९ रोजी शासनाने ग्राभसभेचा शासकीय आदेश (जी .आर .) काढला. परंतु प्रशासनाच्या नकारात्मक व उदासीन भूमिकेमुळे त्याची अंमलबजावणी झाली नाही. मा.अण्णा हजारे यांनी जनआंदोलन उभारले व शासनाने ग्रामसभांना देण्यात आलेल्या अधिकारांची अंमलबजावणी करावी यासाठी आग्रह धरला. परिणामी शासनाने सन २००३ पासून ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश जारी केला आहे.

या अध्यादेशातील सुधारीत तरतुदी व ग्रामसभेचे अधिकार काय आहेत ते पाहूयात.

शासनाच्या आदेशानुसार आता प्रत्येक ग्रामपंचायतीला वर्षातून सहा ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. ग्रामसभेच्या दोन सभांच्या दरम्यान तीन महिन्यांपेक्षा जास्त कालावधी नसावा. सरपंचाने किंवा उपसरपंचाने दिलेल्या कालावधीत अशी कोणतीही ग्रामसभा बोलविण्यास कसूर केल्यास सचिव (ग्रामसेवक) सभा बोलावतील आणि अशी सभा सरपंचाच्या/उपसरंपचाच्या सहमतीने बोलाविण्यास

आली आहे असे समजण्यात येईल.

पंचायतीच्या प्रत्येक वर्षीच्या पहिल्या ग्रामसभेत सरपंच किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच अध्यक्षस्थानी राहील. आणि त्यांनतरच्या इतर सर्व ग्रामसभांमध्ये उपस्थित ग्रामस्थांमधून निवडलेली व्यक्ती अध्यक्षस्थानी राहील.

ग्रामसभेच्या महिला सदस्यांची स्वतंत्र ग्रामसभा नियमित ग्रामसभेपूर्वी( आदल्या दिवशी) घेण्यात येईल. (महिलांनी या संधीचा फायदा घ्यावा व आपले प्रश्न ग्रामसभेत मांडावेत.) या ग्रामसभेला गणपूर्तीची अट नाही. गावामध्ये काम करीत असलेल्या शासकीय,निमशासकीय (उदा.तलाठी, शिक्षक, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका) व पंचायतीच्या कर्मचाऱ्यावर (उदा. ग्रामसेवक, शिपाई इत्यादी.) तसेच त्यांच्या कार्यालयातील रोजच्या उपस्थितीवर देखील ग्रामसभेचे शिस्तविषयक नियंत्रण असेल . अशा कोणत्याही कर्मचाऱ्याकडून कोणतीही नियमबाह्य गोष्ट घडली असल्यास ग्रामसभा संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यास अहवाल देईल.

ग्रामसभेने सूट दिली नसेल तर गावात काम करणारे शासकीय, निमशासकीय व पंचायतीचे सर्व कर्मचारी ग्रामसभांना हजर राहतील.

प्रत्येक ग्रामसभेचे कार्यवृत्त ग्रामपंचायतीचा सचिव (ग्रामसेवक) तयार करील; परंतु त्याच्या अनुपस्थितीत सभेचे कार्यवृत्त सरपंच सूचवतील त्याप्रमाणे गावातील शिक्षक, तलाठी किंवा अंगणवाडी सेविका यांसारखा कोणताही शासकीय निमशासकीय किंवा पंचायतीचा कर्मचारी तयार करील आणि ते अभिलेखाकासाठी पंचायतीकडे सुपुर्द केले जाईल. ग्रामसभा राज्य शासनाच्या किंवा केंद्रशासनाच्या व्यक्तीगत लाभधारक योजनांकरिता लाभार्थींची निवड करेल.

ग्रामपंचायतीच्या कामकाजास पूरक अशा दक्षता समिती, ग्राम शिक्षण समिती, सार्वजनिक वितरण व्यवस्था (रेशनिंग) समिती, पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता समिती, वनसरंक्षण समिती इत्यादी समित्यांची निवड ग्रामसभेतच केली जाईल.

सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजनांच्या अंमलबजावणीची तसेच विकास योजनांवर कोणताही खर्च करण्याची परवानगी पंचायतीला ग्रामसभा देईल.

महाराष्ट्र शासनाने ग्रामसभेला हे अधिकार देऊन एक प्रकारे गावातील लोकांना सामर्थ्य व बळ प्राप्त करून दिलेले आहे. हे अधिकार परिपूर्ण आहेत असे नाही. त्यामध्ये काही त्रुटी आहेत हे निश्चित; परंतु हेही नसे थोडके या उक्तीप्रमाणे महाराष्ट्र शासनाने इतर राज्यांच्या तुलनेत ग्रामसभांना बरेच अधिकार दिले आहेत. मा. अण्णा हजारेंच्या सुचनेनुसार सरंपचांना परत बोलाविण्याचा अधिकार देखील सरकार देऊ इच्छित आहे. पण काही लोकांच्या विरोधामुळे त्यावर निर्णय होऊ शकलेला नाही. त्यातूनही काही पर्याय समोर येतील व लवकरच तोही अधिकार ग्रामसभांना मिळेल यात शंका नाही.

ग्रामसभांना जादा अधिकार मिळाले परंतु शासनाच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आता जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींची आहे. तसेच लोकांना मिळालेले अधिकार त्यांनी वापरले पाहिजेत, पण त्यांना अधिकारांची माहिती व जाणीव करून देण्याचे काम काही सेवाभावी व्यक्ती व संस्थांना करावे लागणार आहे, कारण पंचायत संस्थांमधली अधिकारी व राजकारणी मंडळी ग्रामस्थांना त्यांच्या अधिकारांची माहिती होऊ देणार नाहीत.

शिवाय काही प्रशासकीय अडचणीसुद्धा आहेत. अनेक तालुक्यांमध्ये ग्रामसेवकांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे शासनाने कितीही विकास योजना जाहीर केल्या किंवा ग्रामसभांना कितीही अधिकार दिले तरी अशा प्रशासनिक अडचणींमुळे त्यांची अंमलबजावणी होणे कठीण जाते. त्यामुळे नियमांप्रमाणे सर्व काही घडेल असे नाही. त्यासाठी शासनाने प्रथम या समस्या सोडविणे गरजेचे आहे, तरच शासनाच्या नियमांना व आदेशांना काही अर्थ राहील.

लोकांनी सुद्धा आता तटस्थ राहून चालणार नाही. ग्रामसभा हे आपल्या विकासाचे व समस्या निवारणांचे व्यासपीठ आहे. आपल्या अधिकारांचा वापर करून ग्रामपंचयातीवर नियत्रंण ठेवण्याचा व आपल्या गावाचा विकास करून घेण्याची संधी मिळालेली आहे/ तिचा फायदा घ्यावा. ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांमागे सर्व गावकरी एकत्र येऊन एकजुटीने उभे राहिले तर गावाहिताच्या निर्णयाला विरोध करणे गावगुडांना शक्य होणार नाही आणि भ्रष्टाचारालाही प्रतिबंध होईल.

■ ■ ■

*( पान क्र. ३२ वरुन पुढे चालू )*

आणणारी, सुरक्षिततेच्या दृष्टीने गुप्त असणारी, संसद व विधानमंडाळाच्या विशेषाधिकारांचा भंग करणारी इत्यादी गोष्टींशी संबंधित माहिती देता येणार नाही.

मा. अण्णा हजारे यांनी सतत पाठपुरावा करून, वेळप्रसंगी संघर्षाच्या मार्गाने जनतेच्या हिताचा व महत्वाचा कायदा पास करून घेतला आहे. आता जनतेने या कायद्याचा जास्तीत जास्त वापर करून आपल्याला पाहीजे असलेली माहिती मिळवावी व भ्रष्टाचाराला प्रतिबंध करावा, तरच या कायद्याचा प्रभाव टिकून राहील.

■ ■ ■

## *रक्त मधून यात्रा*

– बार्नी बुश (१९४५)

भावांना बघून फार दिवस लोटतात तेव्हा,
ती फार काळ जातो निघून
बहिणींना भेटून
एक दुसऱ्यांना पाहून
फार लोटतात दिवस
त्यावेळी आपण त्यांना पाहू
लागतो गहिऱ्या स्वप्नांमध्ये
ज्यांनी निर्माण केली ही वर्तमानता
गीत, पहाड गवताची कुरणं,
ढोल,श्वापद जगणं,
आपण पाहतो कितीतरी जीवांची एकात्मता
सर्वान्त सामवणारी
स्वप्नांची वर्तुळता
रक्तांच्या प्रवाहांतून
कधीही संपत नाही यात्रा

(मराठी अनुवाद –भुजंग मेश्राम)

# दलित आदिवासींच्या जमीनी, निवासस्थान बळकावण्याचे अत्याचार थोपवलेच पाहिजेत

- रा.बि. भुस्कुटे

कै. राजीव गांधी पंतप्रधान असतांना त्यांच्या कारकीर्दीत भारताच्या लोकसभेने अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ ऐतिहासिक विधेयक मंजूर केले. अनुसूचित जाती जमातींचे माणुसकीचे हक्क पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी मोठ्या दूरदृष्टीने केलेली ही एक विख्यात दूरगामी कार्यवाही आहे. अनुसूचित जाती आणि जमातीच्या सदस्यांविरूध्द होणाऱ्या अत्याचाराच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करणे, असे गुन्हे घडू नयेत म्हणून प्रतिबंधात्मक कारवाई करणे, या गुन्ह्याचे खटले चालविण्यसाठी खास कोर्टाची तरतूद करणे या तदनुषंगिक बाबींमध्ये तजवीज करणे, ही या कायद्याची उद्दिष्टे आहेत.

आजपर्यंत दबलेल्या पण नव्याने जागृत झालेल्या दलितांच्या आदिवासींच्या हक्कमागणीमुळे आणि नव्याने निर्माण झालेल्या स्वाभिमानामुळे सवर्ण आणि सधन भयंकर चिडतात. त्यांच्या रागाचा पारा चढतो. सरकारने दलित आदिवासींना दिलेल्या जमिनी त्यांनी कब्जा करून लागवडीस आणण्यास या लोकांचा विरोध होता एवढेच नाही तर सरकारने दिलेली जमीन ते लावतात व ताठ मानेते ते राहू लागतात. वेठबिगारी, शेतमजुर म्हणून काम करायचे नाकारतात. म्हणून त्यांच्यावर सवर्ण जमीन मालकांनी संघटीत क्रूर हल्ले केलेले आहेत. त्यांची घरे जाळली आहेत. मराठवाड्यात आदिवासी भागात विशेषत: असे हल्ले वारंवार झालेले आहेत व अजूनही होत आहेत.

दलित आणि आदिवासींवर होणाऱ्या अत्याचारामध्ये अत्याचार करणारा विरूद्धची चौकशी पोलीसांनाच प्रामुख्याने करावी लागते. अत्याचार म्हणून विशेष गुन्हा किंवा गुन्हे भारतीय दंड संहितेमध्ये विशद केलेले नाहीत. ही बाब पोलीसांना खूप अडचणीची वाटते. त्याचप्रमाणे नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ मध्येही असा काही स्पष्ट उल्लेख केलेला नाही. अत्याचाराची व्याख्या वगैरे दिलेली नाही. ब्युरो ऑफ पोलीस रिसर्च १९७९ मध्ये असे सुचविले होते की, 'अत्याचार' या सदरात जेंव्हा एखादा गुन्हा मोडतो तेंव्हा त्यामध्ये क्रूरता, पाशवीपणा, दुष्टपणा यांचा असा अंतर्भाव असतो. त्याचप्रमाणे हरीजनांना आदिवासींना चांगली अद्दल घडविणे या बलवत्तर भावनेने सवर्णांनी धनिकांनी केलेला गुन्हाही असतो. समाजातील असहाय्य आणि दुर्बल घटकांसाठी खास सहानुभूती भारतीय गुन्हा संहितेमध्ये दिग्दर्शित होत नाही. तेव्हा 'अत्याचार' या शब्दाची व्याख्या संहितेमध्ये देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

नागरीक हक्क संरक्षण कायदा, भारतीय दंड संहिता, वेठबिगार पद्धती (निर्मुलन) कायदा याखालील गुन्ह्यांसाठी नेमलेल्या शिक्षेच्या तुलनेत अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली नेमलेली शिक्षा जास्त कडक आहे. दहशत निर्माण करणारा कायदा आहे. नागरीक हक्क संरक्षण कायद्याप्रमाणे दंडाची रक्कम रू.५०००/-

पर्यंत मर्यादित आहे. तर या कायद्याखालील दंड रकमेवर मर्यादा घातलेली नाही. या कायद्याखालील गुन्ह्यासाठी वापरलेली जंगम व स्थावर मिळकत अटकावण्याची जप्त करण्याची तरतूद आहे. स्पेशल कोर्ट आणि स्पेशल पब्लीक प्रॉसीक्युटर नेमता येतो. पकडण्यात आलेल्या व्यक्तीला ॲटीसिपेटरी बेल (आगाऊ जामीन) मिळविण्याचा हक्क नाही. तसेच हा गुन्हा अजामीनपात्र आहे.

या कायद्याखाली जमीन व घर अन्यायाने काढून घेणे हा अत्याचारी गुन्हा ठरविलेला आहे. या कायद्याखाली कलम३, पोटकलम १ चा अनुक्रमांक ४ व ५ व १५ वर हे याबाबतच्या अत्याचाराचे गुन्हे दिले आहेत ते खाली दिले आहेत.

कलम ३ पोटकलम १ अनुक्रमांक ४ अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या सदस्यांच्या मालकीची जमीन किंवा सक्षम अधिकाऱ्याने त्यास दिलेली किंवा देऊ केलेली जमीन अन्यायाने कब्जात घेणे किंवा लागवड करणे किंवा हस्तांतरीत करणे.

कलम ३ पोटकलम १ अनुक्रमांक ४ अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या सदस्यांच्या जमिनीचा, रहात्या घराचा अन्यायाने कब्जा काढून घेणे किंवा त्यांच्या शेतजमिनीचा घराचा भोगवटा करण्यामध्ये ढवळाढवळ करणे.

कलम ३ पोटकलम १ अनुकम्रांक १५ अनुसूचित जातीच्या किंवा अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस तिचे घर, गांव किंवा अन्य निवासस्थान सोडण्यास भाग पाडणे किंवा तसे करण्यास कारणीभूत होणे.

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रातून तसेच मराठवाड्यातील जिल्ह्यातून आदिवासी आणि दलित यांच्या मालकीच्या जमीनी त्यांना दिलेल्या किंवा देऊ केलेल्या सरकारी पडीक जमीन आणि त्यांची निवासस्थाने बळकावून त्यांच्यावर फार मोठ्या प्रमाणात सर्रास अत्याचार होत असतात. तेव्हा या कायदा झाल्यापासून १९८९ पासून २००३ अखेरपर्यंत आदिवासी आणि दलितांच्या जमिनी व घरे काढून घेतल्याचे गुन्हे वारंवार घडतात तेथे प्रतिबंधात्मक कारवाई करणे योग्य ठरेल. तसेच काही राजाश्रय असलेले गुंडआदिवासी दलितांच्या जमिनी व घरे निवासस्थाने वारंवार बळकावून अत्याचाराचे गुन्हे करतात. अशा काही मोजक्या गुंडांना तडीपार करण्याची कार्यवाही करणे युक्त ठरणार आहे. हे कठीण काम आहे. पण करावे लागणार आहे. ज्या ठिकाणी आदिवासी अल्पसंख्य आहेत. तसेच ज्या गावांतून मोजकी दलितांची घरे आहेत. तेथे विशेष करून या कायद्याचे कलम ३ पोटकलम १ अनुक्रमांक १३ वर नमुद केलेला पाणी, दुषित किंवा घाण करण्याचा अत्याचार करण्यात येतो असे अनुभवास आले आहे. तेव्हा अशा संवेदनाक्षम जुनाट विचारसरणीच्या सवर्ण गावांवर खास लक्ष देण्याचा सूचना संबंधित तालुका दंडाधिकारी आणि पोलीस स्टेशनला देणे गरजेचे आहे. याबाबतीत जन संघटना, दलित आणि आदिवासी कार्यकर्त्यांचे सहाय्य नक्कीच उपयोगी पडेल.

■ ■ ■

# आयुषीच्या डायरीतील काही पानं

- ग.शां पंडित

आयुषी एक आरोग्य सेविका. सरकारी नोकरी ,त्यामुळे सतत कुठे ना कुठे बदली होत रहायची अशीच एक बदली गडचिरोली या आदिवासी भागात झाली होती. तीन वर्षे ती तिथे होती. या तीन वर्षात तिला जे काही बरे-वाईट अनुभव आले त्यापैकी काही तिने तिच्या डायरीत लिहिले आहेत. आतापर्यंत आयुष्यात झालेल्या बदल्या आणि या बदलीतला अनुभव काही वेगळाच होता. माणसातल्या वेगळेपणाचा वेगळ्या संस्कृतीचा आणि माणुसकीचा हा अनुभव होता.

**१२ ऑक्टोबर १९९०**

सकाळी पोस्टमनने एक पत्र माझ्या हातात दिले. ते पत्र वाचता वाचता मला घाम फुटू लागला थोडावेळ काहीच सुचेना. पाणी प्यायले आणि खुर्चीवर शांत बसून विचार करू लागते.

माझी बदली एका आदिवासी भागातील आरोग्य उपकेंद्रात झाली होती. कुटुंबाला सोडून एकटीने अशा भागात जायचे,ही कल्पनाच मला सहन होत नव्हती, शिवाय तिथले लोक कसे असतील , त्यांची भाषा मला समजेल का? असे प्रश्न डोक्यात जमा झाले.

संध्याकाळी माझ्या पतिराजांना ते पत्र दाखवलं. मला वाटलं ते नाराज होतील, पण तसं काही झालं नाही, उलट त्यांनी सांगितलं की, तू कुठलाही विचार न करता खुशाल जा. तिथे काम करण्याचा तुला चांगला अनुभव मिळेल. लोकांची भीती बाळगू नको. ते स्वभावाने खूप चांगले असतात असं मी ऐकलंय. पतिराजांनी सांगितल्यामुळे मला सुद्धा बरं वाटलं.

**१३ ऑक्टोबर १९९०**

दोन दिवसांनी घर सोडावं लागेल. म्हणून मी जाण्याची तयारी सुरू केली. प्रवास दूरचा असल्यामुळे रेल्वेचे ॲडव्हान्स बुकींग केलं. लागणाऱ्या सर्व वस्तू बॅगेत भरल्या . सर्व तयारी करून ठेवली दोन दिवस माझे तयारी करण्यातच गेले.

**१५ ऑक्टोबर १९९०**

आज सकाळच्याच गाडीत मी बसले. रेल्वे स्टेशन पर्यत पोचवायला पतिराज आले होते. मुलाची शाळा असल्यामुळे त्याला आणता आले नाही. अठरा तासांचा प्रवास होता, म्हणून बरोबर काही पुस्तके व खाद्यपदार्थ घेतले होते.

गाडी सुटताना मन दाटून आले होते. मनात विचारांची गर्दी झाली होती. बराच वेळ विचारांच्या तंद्रितच गेला. दुपारी लोकांचा गलका वाढला तेव्हा भानावर आले. बरोबर डबा आणला होता. जेवून घेतले. आणि पुढच्या प्रवासात पुस्तके वाचता- वाचता मला झोप लागली . जाग आली तेव्हा गाडी एका स्टेशनावर उभी होती. माझे उतरण्याचे ठिकाण आले होते. रात्र बरीच झाली होती . इथून पुढे आणखी ४ तासांचा प्रवास होता. परंतु गाड्या नसल्यामुळे मी स्टेशनवरच थांबले.

**१६ ऑक्टोबर १९९०**

सकाळी माझा एसटीचा प्रवास सुरू झाला. जातांना हवेत गारवा जाणवत होता. ताडाची , माडाची

आंब्याची झाडे दिसत होती. हिरवीगार शेते होती. लाल माती उडून दिसत होती. ते मनोहरी दृश्य पाहता पाहता चार तास कधी संपले कळलेच नाही. एसटीतून उतरले तेव्हा जान्या मला न्यायला आला होता. जान्या गावात आरोग्य रक्षकाचं काम करायाचा. तो स्वत: आदिवासी होता. त्यानं माझ्याकडचे काही सामान घेतले आणि आम्ही त्याच्या घरी गेलो. जान्याचं घर स्वच्छ ठेवलेले होतं. ओटी सारवलेली होती. कुडाच्या भिंती माती–शेणाने लिंपलेल्या होत्या. त्याच्यावर पांढऱ्या रंगात छान छान चित्रे काढली होती. घराचे छप्पर कौले व झाडांच्या पानांचे होते . हे पाहून मनाला प्रसन्नता वाटली. प्रवासाने दमलेली होते, म्हणून जेवण करून मी लगेचच झोपी गेले.

**१७ ऑक्टोबर १९९०**

गावात उपकेंद्राची स्वतंत्र इमारत नव्हती म्हणून मी जान्याला माझ्यासाठी घर शोधायला सांगितलं. त्यावर जान्या म्हणाला , बाई तुम्ही एकट्या कशा राहणार? जान्याच्या प्रश्नाने मी थोडी घाबरले. का रे , इथं बाई एकटी रहायला काही भीती आहे का? मी विचारलं. नाही तसं नाही. इथं कुणीही तुम्हांला त्रास देणार नाही. आदिवासी पुरूष दुसऱ्या बाईला त्रास देत नाहीत. जान्याने उत्तर दिले.

मग काय अडचण आहे? मी विचारलं. त्यावर जान्या म्हणाला, तशी तुम्हांला काही अडचण येणार नाही. पण तुम्ही अविवाहित असता तर मात्र अवघड होतं. जान्याचे हे उत्तर जरा मला गमतीचं वाटलं म्हणून मी त्याला विचारलं , काय झालं असतं रे ?

अविवाहित बाईला एकटी राहायला इथं कुणी घर देत नाही. कारण मासिक पाळीत ती बाहेर बसत नाही. इथं पाच दिवस घराबाहेर बसावं लागतं. खाणं–पिणं सगळं बाहेरच. जान्याने सांगितले. पण जान्या, ही समजूत चुकीची आहे. मी म्हणाले. होय ,खरंच बाई . पण लोकांना कोण समजवणार? जान्याचं म्हणणं खरं होतं. लोकांना हळूहळू हे पटवून द्यायला पाहिजे, असा विचार करून मी गप्प बसले. माझ्यासाठी घर शोधण्यासाठी जान्याचे दोन दिवस गेले.

**२० ऑक्टोबर १९९०**

माझं सर्व सामान घेऊन मी माझ्या घरात आले. जान्या सामान लावण्यासाठी मदतीला होताच. दिवसभर सामान लावण्यात गेला.

**२१ ऑक्टोबर १९९०**

आज माझ्या कामाचा पहिला दिवस होता. जान्याला घेऊन मी गाव पहाण्यासाठी व लोकांच्या ओळखी करून घेण्यासाठी जायचं ठरवलं . पण जान्या म्हणाला. बाई इथल्या लोकांना तुमची मराठी नीट समजणार नाही. तुम्हांला पण त्यांची भाषा कळणार नाय. मग काय करायचं? मी विचारलं. मी तुम्हांला काही शब्द सांगतो ते तुम्ही पाठ करा. म्हणजे तुम्हांला लोकांशी बोलणं सोपं जाईल. जान्याची ही सूचना मला खूपच आवडली. आज दिवसभरात जान्याने मला सर्व गाव व पाडे दाखवले.

आरोग्य व आजार याबद्दलच्या काही शब्दांची ओळख जान्याने मला करून दिली. आठ–दहा दिवसांत मला बरेच शब्द माहिती झाले. लोकांच्या बोलण्यातूनही ऐकायला मिळाले.

**१ नोव्हेंबर १९९०**

हळूहळू लोकांच्या ओळखी होत होत्या.

पांढरी साडी घालून गावात, पाड्यांवर फिरू लागले की लोक बरोबर ओळखायचे की आरोग्याची बाई आली. एक नुकत्याच बाळंत झालेल्या बाईला भेटायला मी गेले. जान्या बरोबर होताच. त्या घरात मी अचानक गेले. तेथे जमलेली लोकं पटापट आपआपल्या घरात गेली. मला सुद्धा घराबाहेर काढलं हे काय चाललंय मला समजलं नाही जान्याला विचारलं तेव्हा त्याने सांगितलं. बाई घरात जाण्याआधी अंघोळ करून कपडे बदलून यायचं असतं. पण का ? मी विचारलं. अहो बाई बाळंतीण बाईचा विटाळ नऊ महिन्यांचा असतो. आम्ही त्याला अपवित्र मानतो? अरे तू आरोग्याच काम करतोस ना? जान्याला थोडं लाजल्यासारखं झालं तरीही तो म्हणाला,बाई मला तुमचं पटत असलं तरी मला पण गावात रहायचंय. लोकांना काही सांगत बसलो, तर ते माझं ऐकणार आहेत का? पुढे काही न बोलता मी घरी परत आले.

**२ नोव्हेंबर १९९०**

कालचा अनुभव माझ्या डोक्यातून जात नव्हता. सकाळी जान्या माझ्याकडे आला तेव्हा मी पुन्हा तो विषय काढला. जान्या , बाळंतीण बाईच्या बाबतीत तुमची अशी समजूत असेल. तर गरोदर बाईला तुमच्या या चालीरीतिंचा किती त्रास होत असेल? तिला उपाशी सुद्धा ठेवत असाल? माझ्या या बोलण्याने जान्या थोडा चिडलाच, नाही बाई, इतकी वाईट माणसं नाहीत आम्ही. उलट तुमच्या समाजापेक्षा आमच्या समाजात बाईला चांगली वागणूक मिळते. लैंगिक छळाचे प्रकार आमच्यात नाहीत. स्त्री– पुरूष दोघेही आपल्याला पंसतीने लग्न करतात. हुंडा पद्धत आमच्यात नाही आणि गरोदर बाईच्या आहाराचे म्हणाल तर तिला जेवण जास्त देतोच; पण शिकारीतले दोन वाटे सुद्धा जास्त देतो. आमच्यात काही वाईट गोष्टी आहेत, तशा काही चांगल्या सुद्धा आहेत. जान्याच्या या उत्तराने मी गप्प झाले.

जान्या त्यांच्या समाजाची व्यवस्थित माहितीदेत होता आणि म्हणूनच मलाही ते कळत होते. त्याच्याबरोबर हिंडून मी लसीकरण, कुटुंब नियोजच्या केसेस शोधल्या. गावातील पोलीस पाटील, सरपंच, तरूण–तरूणींची ओळख करून घेतली. या ओळखी–पाळखी व केसेस शोधण्यात महिना गेला.

**डिंसेबर १९९०**

दोन तीन महिन्यांच्या काळात माझ्या कामाचा व्याप वाढला होता. भाषेची अडचण जाणवत नव्हती. कारण भाषेची ओळख मला झाली होती. पण एक अडचण मला मात्र सतत जाणवत होती. लोक माझ्या औषधांपेक्षा गावाच्या भगतावर जास्त विश्वास ठेवायचे. काही लोक झाडपाल्याचे उपाय करायचे, पण त्यांना गुण आला नाही तर पुन्हा भगताकडे जायचे. भगताच्या विरूध्द लोकांना काही सांगणे शक्य नव्हते म्हणून मी ठरवंल की भगताला विश्वासात घ्यायचं, मी त्याला भेटले व सांगितले की तू तुझे उपचार चालू ठेव पण माझी औषधे पण लोकांना दे. त्यांचा तुझ्यावर विश्वास आहे, तेव्हा तू दिलेले औषध ते घेतील. भगताला हे पटलं. त्याने माझी औषधे ठेवायला सुरूवात केली.

काही दिवस गेल्यावर भगताला देखील समजलं की आपल्या उपायांनी लोकांना बरं वाटत नाही. पण लोकांसमोर हे कबूल करणे त्याला शक्य नव्हतं म्हणून त्याने आम्हांलाच मदत करायचं ठरवलं.

भगत हा इथल्या आदिवासींचा देवच आहे. भगताला हे लोक परमा म्हणतात. परमा हे पद वंश परंपरेने मिळते. कोणत्याही प्रकारची कामे असली तरी

भगताला विचारल्याशिवाय होत नाहीत. डॉक्टरांचं काम देखील भगतच करत असतो. म्हणूनच मी भगताला विश्वासात घेतलं होतं. सुदैवाने भगत सुद्धा माझ्या कामात मदतीला तयार झाला. लोकांच्या काही वाईट सवयी बदलायला भगताची मदत झाली. संडासाला जाताना पाणी न्यायचे नाही, दगड किंवा पानाचा वापर करायचा, तंबाखू खाऊन कुठेही थुंकायचे या घाणरेड्या सवयी घालविण्यासाठी मी भगताची मदत घेतली. त्याचा परिणाम मला चांगला दिसू लागला.

**फेब्रुवारी १९९१**

शेतीची कामे संपलेली होती. लोक सण, लग्न उत्सव या गुंतलेली होती, असेच एक लग्न पाहण्याचा योग मला आला. जान्याने मला त्याच्या लग्न पद्धती बद्दल सांगितले होते त्यांच्या लग्नाआधी मुला/मुलींना एकत्र मिसळण्याची मोकळीक असते. ते स्वत:चा जोडीदार निवडू शकतात. हे लग्न सुद्धा असेच जमले होते. लग्न मुलाच्या घरी होते. मुलीकडचे वरात घेऊन तिथे आले . झाडाच्या पानांचा मांडव घातलेला होता. त्या मांडवाच्या मध्यभागी चित्र कोरलेला खांब होता. त्याला मुंडा म्हणतात या खांबाच्या भोवती सगळे धार्मिक विधी झाले. लग्नाच्या रात्री सर्व वयाचे स्त्री–पुरूष नाच करीत होते. स्त्रिया मुले, मुली एकमेकांच्या कमरेत हात घालून रेलॉऽऽऽ रेलाऽऽऽ करत नाचत होते. शेकोटीच्या उबेत रात्रभर नाच चालू होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी वधू वरांना आंघोळ घालण्यात आली. नंतर वधूच्या अंगातील चोळी काढली आणि लग्न सोहळा संपला.

हा सगळा अनुभव मला नविनच होता. हळू हळू या पद्धती मला माहित पडत गेल्या. आदिवासींमध्ये हुड्यांची प्रथा आढळली नाही. त्या ऐवजी वधूलाच थोडं धान्य, कोंबडा, थोडे पैसे देऊन गाव – जेवण दिले जाते. हे सर्व वर देवू शकला नाही तर वधूच्या घरी घरगडी म्हणून रहायचे मगच विवाह होतो.

येथे ऐकायला, पहायला मिळालेल्या गमती जमती मी पत्र पाठवून मुलाला व पतीला कळवत होते. त्यांचीही पत्रे येत होती

**एप्रिल/ मे १९९१**

उन्हाळ्याचे दिवस होते. उकाडा सहन होत नव्हता तरी घरभेटी करण्यासाठी गावात, पांड्यावर हिंडावे लागायचे. तो कामाचाच एक भाग होता. जान्याला बरोबर घेऊन मी प्रत्येकाच्या घरी जात होते. या घर भेटीतून मला असे दिसले की, आदिवासींमध्ये ॲनिमीया (रक्तक्षय) या आजाराचे प्रमाण खूप आहे. जीवनसत्वे,प्रथिने व लोहाच्या कमतरतेमुळे हा आजार होतो. इथल्या लोकांच्या रोजच्या आहारात हिरव्या भाज्या, दूध ,अंडी ,फळभाज्या नसतात. त्या त्यांना मिळणार तरी कुठून?

स्त्रियांमध्ये ॲनिमीया अधिक आहे तर, लहान मुले व पुरुषांमध्ये त्वचारोग व जंत आढळले. या दिवसात पाण्याची टंचाई असते. त्यामुळे रानावनात हिंडताना कुठलेही पाणी पिण्यात येते. आंघोळीला पाणी नसते. अशावेळी मुलांना खरूज होते, माझ्याकडची काही औषधे मी लोकांना दिली. पण ती अपुरी होती. म्हणून मी जिल्हा आरोग्य केंद्राला कळवलं . तिथूनही त्वरीत औषधे मिळाली. या कामात मला भगत आणि लोकांची चांगली साथ मिळाली.

**जुलै/ऑगस्ट १९९१**

पावसाळा सुरू झाला होता. लोकांची शेतीची कामे चालू होती. या भागात पावसाचे प्रमाण जास्त

त्यामुळे बाहेर निघणे कठीण व्हायचे. अधूनमधून जुलाब ,हगवणीच्या केसेस येत होत्या. गढूळ , दूषित पाणी प्यायल्यामुळे लोक आजारी पडत होते. या दिवसात पुरूषांचे दारू पिण्याचे प्रमाणही जास्त होते. पावसाळ्यात आदिवासींना अन्नाची कमतरता भासते. कणगुल्यात साठवलेलं धान्य रोज कांडून त्याची आंबिल प्यायची आणि दिवसभर ताडी किंवा दारू पिऊन रहायचं. अधूनमधून मासे मारायचे. अशा अपुऱ्या आहाराचा परिणाम त्यांच्या आरोग्यावर होत होता.

मी जिल्हाच्या ठिकाणी मिटींगला जायचे तेव्हा हा रिपोर्ट द्यायचे. यापेक्षा माझ्या हातात काय होतं?

**२९ सप्टेंबर १९९३**

आज सकाळपासून मला बैचेन झाल्यासारखं वाटत होतं ऑफिसकडून निरोप आला होता , की तुमची बदली झाली आहे. ते ऐकून मनाची घालमेल सुरू होती. काय करावं काही सुचत नव्हतं.

जान्याला हे सांगितले तेव्हा तो गप्पच झाला, त्यालाही काही बोलवत नव्हतं. काही न बोलता तो निघून गेला. गावात ही बातमी कळली, तसे हळूहळू एकेक जण घरी येऊ लागलं.

घरात भयाण शांतता पसरली होती. मधूनच कोणी तरी हुंदके दिल्याचे आवाज येत होते. मी एका कोपऱ्यात शांत बसले होते. लोकांना कसं आणि काय समजावायचं , हेच कळत नव्हतं. मला जेवण गोड लागेना. सगळी रात्र विचारात व आठवणीत गेली.

**३० सप्टेंबर १९९३**

सकाळपासून गावातले , पाड्यावरचे लोक भेटायला येत होते. प्रत्येक जण बाई, जाऊ नका असं सांगत होते. त्यांना समजावताना मला गहिवरून येत होतं तरीही धीर एकवटून मी त्यांना सावरत म्हणाले, माझी नोकरीच अशी आहे. तुमच्यासारखी इतर लोकांचीही सेवा मला करायची आहे. असेच प्रेम ठेवा आणि एकमेकांशी प्रेमानं, समजुतीनं वागा. स्वत:च्या आरोग्याकडे लक्ष द्या. पुढे मला बोलवतं नव्हतं. दुपारी माझे पती व मुलगा मला नेण्यासाठी आले. संध्याकाळी त्यांना गाव, पाड्यावरील लोकांची ओळख करून दिली. रात्री सर्व तरूण-तरूणींनी आमच्यासाठी त्यांचा नाच सादर केला.

**१ ऑक्टोंबर १९९३**

सकाळी सगळ्या सामानाची आवराआवर केली. दुपारची एसटी होती. म्हणून गावात फिरून आले. जान्याची समजूत काढली. गावातल्या बऱ्याच बायांनी वानवळा म्हणून काही वस्तू भेट दिल्या होत्या.

दुपारी एसटी स्टॅन्डवर निरोप द्यायला गावातली मुलं, मुली, बायका, भगत सगळी मंडळी जमली होती. एसटीत बसताना मला माझे अश्रू लपवता आले नाहीत. खूप रडले. एसटी धावत होती. मी विचारात रमले होते. तीन वर्षापूर्वी इकडे येतांना मनात भीती होती , पण आज मात्र माझं मन हा भाग सोडायला तयार नव्हतं. साध्या भोळ्या या लोकांपासून, मनमोहक निसर्गापासून दूर जायला मन तयार नव्हतं पण काय करणारं , नोकरीचा प्रश्न होता.

■ ■ ■

## पुस्तक परिक्षण

# आदिम

- पल्लवी मराठे

डॉ. शौनक कुलकर्णी यांनी लिहिलेल्या आदिम या पुस्तकातील विषयाची व्याप्ती लक्षात घेता परिक्षण कसं आणि कुठून सुरू करावं हाच एक मोठा प्रश्न पडतो पण एका वाक्यात जर सांगायचं झालं तर डॉ. कुलकर्णींनी लिहिलेले हे पुस्तक माणसाला स्वत:चीच नव्याने आणि जवळपास पूर्णांशाने ओळख पटवून देतं

प्रस्तावनेत डॉ के.एस. नायर यांनी नेमक्या शब्दांत सांगितल्याप्रमाणे हया पुस्तकात खरोखरच मानवशास्त्रासारख्या गहन परंतु उत्कंठापूर्ण विषयाचा सोप्या आणि सुटसुटीत पद्धतीने आढावा घेतला आहे. तसेच प्रादेशिक भाषेतील अशा विषयांच्या पुस्तकांची कमरतरता भरून काढण्याचं काम हे पुस्तक चोखपणे करतं आणि हे काम पुढे अशाच प्रकारे चालू राहील अशी आपण आशा करू.

डॉ शौनक कुलकर्णी यांनी मनोगतात म्हटल्याप्रमाणे पारंपारिक शिक्षण पद्धती मानवशास्त्र हा विषय सर्वपरिचित नाही, त्यामुळे अशा प्रकारच्या प्रादेशिक भाषेतील पुस्तकांमुळे नक्कीच हा उत्कंठापूर्वक विषय समजातील निरनिराळ्या थरांतील लोकांपर्यंत पोचू शकेल. तसेच शिक्षण आणि व्यवसायांतील नवीन वाटा सुद्धा दाखवून देण्याचं काम नक्कीच करेल.

पुस्तकाची अनुक्रमणिका आपल्याला विषयाची व्याप्ती आणि मानवशास्त्राच्या उपशाखांचं वैविध्य लक्षात आणून देते. अनुक्रमणिका बघून अगदी जीवशास्त्राशी वावडं असणाऱ्या लोकांच्या मनात देखील उत्सुकता निर्माण होईल.

मानवशास्त्र आणि त्याचे जीवशास्त्रीय स्वरूप या पहिल्या भागात लेखकाने प्रथम मानवशास्त्राचा उगम कुठे व कसा झाला तसेच मानवशास्त्राच्या विविध शाखांची माहिती दिली आहे या भागात लेखकाने जीवशास्त्रीय मानवशास्त्राची माहिती दिली आहे. तसेच लेखकाने प्रश्न स्वरूपात वाचकांच्या मनात कुतूहल निर्माण करण्याचा आणि त्यांच्या जिज्ञासेला प्रोत्साहन देण्याच्या पद्धतीचा अवलंब केला आहे आणि या प्रश्नांद्वारे मानवशास्त्र हे जीवशास्त्रीय दृष्टीकोनातूनही का अभ्यासले जाते याचे विवेचन केले आहे.

मानवी उत्क्रांती आणि सृष्टीतील मानवाचे स्थान या शिर्षकाखाली लेखकाने शारीरिकदृष्ट्या मानवाचा विकास वर्षानुवर्षे कसा होत गेला याचा परामर्श घेतला आहे. या भागात माणसाचा उगम आणि उत्क्रांतीबद्दलची शास्त्रीय माहिती देताना डॉ. कुलकर्णी यांनी दूरदर्शन आणि चित्रपट यामुळे सर्वज्ञात असलेल्या डायनोसोरचा संदर्भ घेऊन या क्लिष्ट विषयाला कल्पकतेने हात घातला आहे. तसेच या भागात मानवाच्या वैशिष्ट्यपूर्ण शारीरिक गुणधर्मांची चर्चा केली आहे. त्यामुळे एरवी आपण ज्या गोष्टी गृहित धरून चालतो उदा. आपली वाचाशक्ती, दोन पायांवर चालण्याची सवय , आपली दृष्टी, आपली निरनिराळी

कामे करण्यास उपयुक्त असा हाताचा पंजा. इ. यामागील शारीरिक रचना आणि त्याचे महत्व इ. लक्षात आणून दिले आहे. तसेच उत्क्रांती या संकल्पनेची ओळख आणि डार्विन आणि लॅमार्क यासारख्या विद्वानांचे त्यावरील विचार यांचा उल्लेखही या भागात आला आहे. यामध्ये एक वाक्य डार्विनच्या थेअरीच्या संदर्भात खटकते ते म्हणजे 'कधी विविधता उपकारक ठरते तर कधी अपायकारक 'त्याऐवजी 'विविधतेमुळे असणारे निरनिराळे गुणधर्म कधी उपकारक ठरतात तर कधी अपकारक 'हे वाक्य जास्त सयुक्तिक होईल असे वाटते तसेच या भागाच्या शेवटी मानवाचे संभाव्य पूर्वज कोण असू शकतील आणि पृथ्वीच्या निरनिराळ्या कालखंडाची सविस्तर चर्चा केली आहे.

जैव सांस्कृतिक विकास उत्क्रांतीतून संस्कृतीकडे या भागात सांस्कृतिक निर्मितीचे मूळ शारीरिक देणग्यांमध्ये कशा प्रकारे आहे याची माहिती दिली आहे. तसेच मानवशास्त्राच्या अभ्यासात पुरातत्वशास्त्राचे महत्व सांगितले आहे. तसेच निरनिराळे अवशेष त्यांच्या अभ्यासाच्या पद्धती त्या कामात येणाऱ्या समस्या याबद्दल चर्चा केली आहे.

मानव-अनुवंश शास्त्र या भागात अजून एका महत्वाच्या शाखेचा परिचय दिला असून त्याचे मानवशास्त्रातील महत्व ते अभ्यासण्याच्या पद्धती यांची सखोल चर्चा केली आहे. जीनोम प्रकल्पांमुळे निर्माण झालेल्या औत्सुक्याबद्दलची शास्त्रीय माहिती सोप्या भाषेत या भागात वाचकाला मिळू शकते.

पाचव्या भागात' वंश 'ही संकल्पना स्पष्ट करून ती जीवशास्त्रीय का आहे याचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच वंश कल्पनेचा सामाजिक दृष्टीकोनातुनही ऊहापोह केला आहे जो आजच्या पार्श्वभूमीवर लोकजागृतीसाठी उपयोगी ठरू शकेल . याबरोबरच वंशांचा शास्त्रीय अभ्यास कसा केला जातो, वंश वर्गीकरण पद्धती याची माहिती दिली आहे. तसेच मानवशास्त्र हे मानवशास्त्र का? मानववंशशास्त्र का नाही? याचे स्पष्टीकरणही केले आहे.

रक्तगट, मानवमिती आणि शरीरविविधता या भागात रक्तगट मानवी शरीररचना यामुळे मानवात वैविध्य कसे असते आणि त्याचे मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून महत्व सांगितले आहे ते अभ्यासण्याच्या पद्धती, त्यांचा उपयोग यांची चर्चा करून रक्तातील आणि शरीररचनेतील विकृतींचीही अभ्यासपूर्ण माहिती दिली आहे.

नंतरचा भाग त्वचा रेखन आणि हस्तरेखन हा फारच औत्सुकपूर्ण विषय असून त्यात ते अभ्यासण्याच्या ऐतिहासिक पध्दती पार्श्वभूमी तसेच त्या विषयाचे भविष्यकथनात आणि न्यायवैद्यक शास्त्रात महत्व यांची चर्चा केली आहे. तसेच त्यांच्या वर्गीकरण पद्धती आणि निरनिराळ्या शास्त्रज्ञांचे या विषयातील योगदान यांची माहिती पण दिली आहे.

'दात : विविधता आणि रचनात्मक बदल' या भागात दातांचे प्रकार ,वैशिष्टये यांची माहिती दिली आहे. तसेच उत्क्रांतीच्या अभ्यासात त्यांचे स्थान आणि न्यायवैद्यकशास्त्रात त्याचा केला जाणारा उपयोग याचीही चर्चा केली आहे.

'वाढ ,आहार, पोषण आणि कुपोषण' या भागाची सुरूवात शीर्षकातील संकल्पनांच्या चर्चेने होते. तसेच वाढीचे टप्पे त्याचा पोषणाशी असणारा संबंध त्यावर परिणाम करणारे इतर घटक यांचा उहापोह केला

आहे. तसेच वाढीतील, विकृती आणि त्याची कारणमीमांसाही चर्चिली आहे . हा भाग स्वास्थविषयक जागृतीसाठी उपयोगी ठरू शकेल.

'वार्धक्य' ही एक मानवशास्त्राची नवीन शाखा असून डॉ.कुलकर्णींनी याविषयीची शास्त्रीय माहिती या भागात दिली आहे. तसेच वृद्धत्वाची शारीरिक लक्षणे, मानसिक लक्षणे आणि त्यांचा समाजावर होणारा परिणाम याची माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे मानवशास्त्रीय दृष्टीकोनातून त्यावरील उपाययोजनांबद्दलची माहिती दिली आहे. त्यामुळे वार्धक्य ही काही समस्या नसून एक जीवनाचा नैसर्गिक टप्पाच आहे याविषयी वाचकाची खात्री पटते.

'पुराचिकित्साशास्त्र' या भागात लेखकाने प्राचीन मानवाच्या रोग, आजारपणाचा अभ्यास करणाऱ्या या शाखेचा परिचय करून देऊन अस्थिंचा या अभ्यासास कसा उपयोग केला जातो याची माहिती दिली आहे. तसेच त्यावरून बालमृत्यू, लोकसंख्या जैवसांस्कृतिक घटक याबद्दल निष्कर्ष कसे काढले जातात याची माहिती दिली आहे. त्याचप्रमाणे दंतचिकित्साशास्त्र या शाखेचीही तोंडओळख करून दिली आहे.

पुढील दोन भाग मानवशास्त्रीय सर्वेक्षण आणि दृक मानवशास्त्र यामध्ये मानवशास्त्रीय संशोधनासाठी माहिती कशी गोळा केली जाते तसेच त्यासाठी वापरली जाणारी निरनिराळी तंत्रे. उदा. कॅमेरा याबद्दल माहिती देऊन यामुळे मानवशास्त्र इतर शाखांपेक्षा कसे निराळे आहे हे सांगितले आहे.

सर्वात शेवटी न्याय मानवशास्त्र या गंभीर परंतु अतिशय उपयुक्त आणि व्यवसायाभिमुख शाखेचा परिचय दिला आहे. आणि या शाखेत मानवशास्त्रज्ञांचा सहभाग कशा प्रकारे गरजेचा आहे याचे विश्लेषण केले आहे.

अशा प्रकारे डॉ शौनक कुलकर्णी यांनी आधी सांगितल्याप्रमाणे मानवशास्त्रासारखा क्लिष्ट विषय सोप्या आणि सरळ भाषेत पोचविण्यासाठी केलेला प्रयत्न अतिशय स्तुत्य आहे.

■ ■ ■

| | | |
|---|---|---|
| **पुस्तकाचे नाव** | : | **आदिम** |
| **लेखक** | : | **डॉ. शौनक कुलकर्णी** |
| **प्रकाशक** | : | **सन पब्लिकेशन्स, पुणे** |
| **पृष्ठे** | : | **१४१** |
| **किंमत** | : | **१०० रूपये** |

# त्र्युगानिनी

– वेन्डी रोज (१९४८)

मला जाऊ नका सोडून
कारण मी इच्छिते वार्तालाप नी गाणं
एक आणखी
ते घेऊन जातील मला
घ्या ते आले आधीच
जेव्हा कि माझा चालू आहे श्वास
त्यांना माझ्या अंताची प्रतिक्षा
माझ्या मृत्यूची
आम्ही आदिवासी लोक घेतोय
किती लांबलचक वेळ
दया करा घेऊन चला माझं शरीर
अंधाराच्या स्त्रोताकडे
त्या विराट काळ्या वाळवंटात
जेथे जन्मलीत स्वप्नं
टाका मला पर्वताच्या विशाल अस्तित्वाखाली
अथवा दूर समुद्रात
मला ठेवा अशा स्थळी
जिथे ,त्याला मी सापडू शकणार नाही.

तुम्हांला यावं लागेल
थोडं आणखी जवळ
का की, फार थोडीशी
बाकी आहे वाचा
अन् मी जे करतेय कथन ते आहे महत्वपूर्ण
बस्स मी आहे अंतिम
मी जी जिचे रडायचे स्तन
शुभ्र दुधातून पाहिल्या पोरी
मरताना ज्यांचे तोंड होते शुष्क
गोल थांबला ज्यांचा श्वास
नी डबडबले होते डोळे
घ्या माझा हात हातात
सावळीला सावळीत
जशी पिवळी माती
वितळावी हळूहळू
भूमातेच्या तृष्णेवरल्या
सोनेरी तळावर
मी विरघळतेय
मागल्या स्वप्नांमध्ये

(मराठी अनुवाद –भुजंग मेश्राम)

टिपण:–

टास्मनियन आदिवासी जमातीची अंतिम जीवित सदस्या त्र्युगानिन्निने म्युझियममध्ये आपल्या पतीचे टिकवलेले शव पाहिले होते. मृत्युपूर्व तिने इच्छा व्यक्त केली की मेल्यावर समुद्रकिनारी किंवा घरापाठीमागे तिचे दफन केले जावे. पतीच्या अपमानास्पद स्थितीतल्या शवाप्रमाणे आपल्या शवाची हालत होऊ नये ही तिची इच्छा. तरीही मेल्यावर तिच्या शवाला भुस्सा मारून आणि मढवून ८० वर्षाहून अधिक काळ म्युझियममध्ये प्रदर्शनासाठी ठेवण्यात आला होता.

( ऑस्ट्रेलियन आदिवासी सक्रिय कायकर्ता पॉल साठी सर्मर्पित कविता ,१९७२)

# आठवा ते !

- ज्वॉय हार्जो (१९५१)

आठवा ते आभाळ
ज्याखाली तुम्ही झालेवते पैदा
घ्या समजून हरेक नक्षत्रांच्या कथा
आठवा चंद्राला, ओळख कोणंय ती
ज्याची झालीवती भेट
आयोवा नगराच्या गुत्यावर
आठवा सकाळच्या सुर्याचा जन्म
जो वेळेचा सबल क्षण
स्मरून पहा सुर्यास्त प्रगल्भ होतांना
रात्रीचा मार्ग स्मरा आपला जन्म
कसा संघर्ष केलावता तुमच्या आईनं
तुम्हांला आकार नी प्राण देण्यासाठी
तुम्ही आहात तिच्या जीवनांचे साक्ष
तिच्या आईचे आणि तिच्या आईचेही
आठवा आपल्या पित्याला
तोही आहे तुमचं जीवन
आठवा पृथ्वीला ज्याची तुम्ही आहात त्वचा
लाल पृथ्वी, काळी पृथ्वी ,पिवळी पृथ्वी
श्वेत पृथ्वी, आपण आहोत सर्वंकष पृथ्वी
आठवा रोपटी, झाडं झुडपं प्राणी श्वापदांना
ज्यांच्या प्रत्येकांच्या आहेत टोळ्यां नी कुटुंबं
ऐका त्यांना , आपला इतिहास ऐकवा
ते आहेत जिवंत काव्य, आठवा वारा
आठवा त्याचा आवाज
ज्याला माहीतेय सृष्टीचा उद्‌भव
मी ऐकलंय त्याला गातांना किओवा युद्धाची गाणी
एकदा चौथ्या व मधल्या नाक्यावर
आठवा तुम्ही जे आहात समस्त
आठवा तुम्ही जे आहात ब्रम्हांड
आठवा ते ते जे आहे गतीमान
आणि ते ,जे विकासशील आहात तुम्ही
आठवा की भाषा पसरते अशाने निसर्गात आठवा ते
नृत्य
जी की आहे भाषा
आठवा , आठवत राहा.

(मराठी अनुवाद –भुजंग मेश्राम)

# वाचकांसाठी

प्रिय वाचकहो,

आपल्या कृपाशिर्वादाने व भक्कम पाठबळाच्या जोरावर 'हाकारा' त्रैमासिक रौप्यमहोत्सवात पदार्पण करत आहे. महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातून सर्वदूर 'हाकारा' चा अंक जातो. अगदी कोल्हापूरपासून ते नंदुरबारपर्यंत तर मुंबईपासून गडचिरोली पर्यंत बहुतेक सर्व जिल्ह्यांपर्यंत हाकारा पोहोचलेला आहे.

हाकारा अधिकाअधिक लोकांपर्यंत पोहोचावा व त्याचे रूपांतर वैचारिक चळवळीत व्हावे असे आम्हांला वाटते. या कामात आपण मोलाचे सहकार्य करू शकता.

- आपल्या परिचयातील व्यक्ती वा संस्थांना हाकारा त्रैमासिकाचे सभासद होण्यास सांगून वा त्यांची वर्गणी भरून आपण हाकारा अधिकाअधिक वाचकांपर्यंत पोहोचवू शकता. हाकाराची वर्गणी पुढीलप्रमाणे आहे.

वार्षिक वर्गणी- संस्था रु. १०० (रुपये शंभर फक्त)
व्यक्ती रु. ६० (रुपये साठ फक्त)

- हाकारामधून निरनिराळ्या विषयावर साहित्य प्रसिध्द होत असते. आपण या साहित्याबद्दलच्या प्रतिक्रिया (सकारात्मक वा नकारात्मक) आमच्याकडे जरूर पाठवाव्यात आपल्या प्रतिक्रियांना अवश्य प्रसिध्दी दिली जाईल.
- आदिवासी भागात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी, अभ्यासकांनी आपले अनुभव वा संशोधनात्मक लेख **हाकारा** कडे अवश्य पाठवावेत त्याचा प्रसिध्दीसाठी जरूर विचार केला जाईल.
- आदिवासी भागात अजूनही काही आदिवासी लेखक, कवी आहेत ज्यांच्याकडे प्रतिभा आहे मात्र अभिव्यक्तीसाठी व्यासपीठ मिळालेले नाही. आपण स्वतः वा आपल्या माहितीत असे कोणी असेल तर अशांनी आपले साहित्य हाकाराकडे अवश्य पाठवावे. त्याचे निश्चितच स्वागत होईल.

गेल्या २४ वर्षात आपण हाकाराला भरभरून प्रेम दिले आहे. तुमच्या आमच्यात हाकाराच्या माध्यमातून जो स्नेह निर्माण झाला आहे तो उत्तरोत्तर अधिक वाढत राहो हीच सदिच्छा.

कळावे.

आपल्या सक्रिय सहभागाच्या अपेक्षेत

आपला कृपाभिलाषी
कार्यकारी संपादक

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे. मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना 'हाकारा' चे केवळ वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

- 'हाकारा' वार्षिक सभासद ६० रूपये (व्यक्तींसाठी)
- 'हाकारा' वार्षिक सभासद १०० रूपये (संस्थांसाठी)

परिषदेच्या आजीव सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनिऑर्डरने पाठवावी. **मनिऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.**

पत्रव्यवहाराचा पत्ता

सचिव

*महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद*

*६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७*

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा !